सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३१० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# 'टिपू सुलतान' विधानावरून पुण्यात भाजप-काँग्रेस कार्यकर्ते आमनेसामने

**तभा वृत्तसेवा**

**पुणे:, दि. १५ फेब्रुवारी :**काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतान यांच्या संदर्भात केलेल्या एका विधानामुळे पुण्यातील राजकीय वातावरण चांगलंच पेटलं आहे. या विधानाचा निषेध करण्यासाठी जमलेले भाजप कार्यकर्ते आक्रमक झाले. काँग्रेस भवन परिसरात भाजप आणि काँग्रेसचे कार्यकर्ते आमनेसामने आले. यावेळी दोन्ही बाजूंनी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली, ज्याचे रूपांतर नंतर गोंधळ आणि संघर्षात झाले.

हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांचे काम समकक्ष आहे असे विधान केल्याचा आरोप भाजपने केला आहे. या विधानाच्या निषेधार्थ भाजपने पुण्यात आंदोलन पुकारले. भाजपने सपकाळ यांचा टिपू सुलतानच्या वेशभूषेतील मॉर्फ केलेला फोटो पोस्टर्सवर लावून त्याला 'जोडे मारो' आंदोलन केले. तसेच

## भाजपच्या कार्यकर्त्यांनी दगडफेक केल्याचा काँग्रेसचा आरोप

काँग्रेस भवनासमोर झाले बहु, होतील बहु, परंतु यासम हा अशा आशयाचे बॅनर लावून आपला संताप व्यक्त केला.

काँग्रेस कार्यकर्ते सपकाळ यांच्या समर्थनात रस्त्यावर

दुसरीकडे, काँग्रेसने हे आंदोलन चुकीचे असल्याचे सांगत सपकाळ यांचे समर्थन केले आहे. भाजपनेही यापूर्वी टिपू सुलतानच्या फोटोंचा वापर केला आहे, त्यावर भाजप काय उत्तर देणार? असा सवाल काँग्रेसने उपस्थित केला. तसेच, पुणे शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने 'एपस्टाईन फाइल्स' संदर्भात पंतप्रधान मोदींवर झालेल्या आरोपांवरून लक्ष वळवण्यासाठी भाजप हे स्टंट करत असल्याचा प्रतिआरोप करण्यात आला.

भाजप कार्यकर्त्यांनी दगडफेक केल्याचा काँग्रेसचा आरोप



भाजप कार्यकर्त्यांनी दगडफेक केल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. यामध्ये एक कार्यकर्ता जखमी झाल्याचा दावाही करण्यात आला आहे. आंदोलनादरम्यान परिसरात उभ्या असलेल्या गाड्यांची तोडफोड करण्यात आली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी काँग्रेस कार्यकर्त्यांना काँग्रेस भवनमध्ये रोखून धरले.

या राड्यानंतर काँग्रेस कार्यकर्ते अधिकच आक्रमक झाले असून त्यांनी फरासखाना पोलीस स्टेशनसमोर आंदोलन सुरू केले आहे. भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांना तात्काळ अटक करावी, अशी मागणी काँग्रेसने लावून धरली आहे.

# हर्षवर्धन सपकाळांच्या तोंडाला काळे फासणाऱ्याला एक लाखाचे बक्षीस, मराठा ठोक मोर्चा आक्रमक

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी :** टिपू सुलतान याची छत्रपती शिवाजी महाराजांसोबत तुलना करणारे वक्तव्य केल्याप्रकरणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासमोरील अडचणी अधिक वाढण्याची शक्यता आहे. हर्षवर्धन सपकाळ यांच्या विरोधात मराठा ठोक मोर्चा आक्रमक झाल्याचं दिसून आलं. हर्षवर्धन सपकाळ यांच्या तोंडाला काळे फासणाऱ्यास एक लाख रुपयाचे बक्षीस जाहीर करण्यात आलं आहे. मराठा ठोक मोर्चाचे सोलापुरातील समन्वयक महेश डोंगरे यांनी हे जाहीर केलं.

सोलापूर मराठा ठोक मोर्चाच्या वतीने हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर जोरदार टीका करण्यात आली. हर्षवर्धन सपकाळ यांच्यामुळेच काँग्रेस संपली असं महेश डोंगरे म्हणाले. त्यांच्या तोंडाला जो कुणी काळे फासेल त्याला एक लाखाचं बक्षीस देणार असल्याचं त्यांनी जाहीर केलं. तसेच हर्षवर्धन सपकाळ यांना मराठा समाज रस्त्यावर फिरू देणार नाही असा इशाराही देण्यात आला.

## आपल्या वक्तव्याची मोडतोड केली



टिपू सुलतानाच्या वक्तव्यासंदर्भात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष यांनी अखेर मौन सोडलं आहे. माझ्या वक्तव्याची मोडतोड करून ध चा मा करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना राज्यात दंगली घडवायच्या आहेत, असा आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी एक्सवर शेअर केलेल्या पोस्टमध्ये केला. तसेच पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरेंवर गुन्हा दाखल करण्याची मागणीही त्यांनी केली.

मालेगाव महापालिकेतील उपमहापौरांच्या दालनात टिपू सुलतानचा फोटो लावण्यात आला होता. त्यावर हिंदुत्ववादी संघटनांनी आक्षेप घेतल्यानंतर अखेर हटवण्यात आला. मात्र, याच वादानंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी त्यासंदर्भात एक वक्तव्य केलं. 'टिपू सुलतानला छत्रपती शिवरायांच्या समकक्ष बघितलं पाहिजे, असं सपकाळ यांनी म्हटलं. ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी शौर्य आणि स्वराज्य असा विचार दिला, अगदी त्याचप्रमाणे टिपू सुलतान यांनी त्याच समकक्ष काम केलं, असं सपकाळ म्हणाले. सपकाळ यांच्या या वक्तव्यानं नव्या वादाला तोंड फुटलं. भाजप आणि शिवसेनेने सपकाळ यांच्या वक्तव्याचा चांगलाच समाचार घेतला.


छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना टिपू सुलतान यांच्यासोबत केल्याच्या वक्तव्यावरून राजकीय वर्तुळात मोठा वाद निर्माण झाला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याविरोधात पुण्यातील पर्वती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तेजस ठाकरेंची तब्येत बिघडली

## मुंबईतील रिलायन्स रुग्णालयात उपचार सुरू

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १५ फेब्रुवारी :** माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना ठाकरे गटाचे (डहळीं डशपर णइढ) प्रमुख उद्धव ठाकरे (णववहर्ीं ढहरल-ज्ञशीरू) यांचे धाकटे चिरंजीव तेजस ठाकरे (ढशक्षरी ढहरलज्ञशीरू) यांची तब्येत अचानक बिघडल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे त्यांना बुधवारी तातडीने गिरगाव येथील रिलायन्स रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. तेव्हापासून त्यांच्यावर उपचार सुरू असून, सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून सुधारणा होत आहे, अशी माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली आहे.



तेजस ठाकरे यांना अस्वस्थ वाटू लागल्यानंतर तात्काळ रुग्णालयात नेण्यात आले. रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्यांच्या सर्व आवश्यक वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या. उपचारानंतर आता त्यांना बरे वाटू लागल्याचे समजते. दरम्यान, तेजस ठाकरे यांच्यासोबत रुग्णालयात रश्मी ठाकरे आणि उद्धव ठाकरे स्वतः उपस्थित असल्याची माहिती आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, तेजस ठाकरेंची प्रकृती सध्या नियंत्रणात असून कोणतीही गंभीर स्थिती नाही. डॉक्टर त्यांच्यावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

# महाराष्ट्रात एटीएस ची मोठी कारवाई! एकाचवेळी २१ ठिकाणी छापेमारी

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १५ फेब्रुवारी :** महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) मोठी कारवाई केली आहे. १५ फेब्रुवारी रोजी राज्यात मोठ्या प्रमाणात शोध मोहीम राबवली. यवतमाळ आणि अहिल्यानगर जिल्ह्यात ही कारवाई करण्यात आली, जिथे एकूण २१ ठिकाणी छापे टाकण्यात आले.

एटीएस च्या पथकांनी यवतमाळ जिल्ह्यातील पुसद आणि उमराखेड शहरातील १७ ठिकाणी तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील सात ठिकाणी शोध मोहिम राबवली. ही कारवाई मध्यरात्रीच्या सुमारास सुरू झाली आणि सकाळपर्यंत सुरू राहिली. तरुणांमध्ये कट्टरतावाद आणि दहशतवादी कारवायांचा संशय असलेल्या विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी ही कारवाई केली.

एटीएस पथकांनी संशयितांच्या घरांवर, कार्यालयांवर आणि इतर ठिकाणी धाड टाकली. सर्वांची झडती घेण्यात आली. छाप्यांमध्ये गुन्हेगारी कागदपत्रे, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले. सीसीटीव्ही फुटेज देखील तपासण्यात आले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, छाप्यांमध्ये दहशतवादी संघटनांशी संबंध किंवा तरुणांना एकत्र आणण्याच्या प्रयत्नांशी संबंधित साहित्य आढळले. अद्याप कोणालाही औपचारिकरित्या अटक करण्यात आलेली नसली तरी, एक डझनहून अधिक संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील कट्टरतावाद आणि दहशतवादविरोधी कारवायांवर लक्ष ठेवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली. एटीएसने जिल्हा पोलिस पथकांच्या सहकार्याने काम केले आणि मोठ्या संख्येने पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले. राज्यात अनेक तरुणांमध्ये कट्टरतावाद निर्माण होत आहे. या माहितीच्या आधारे हे छापे टाकण्यात आले. गेल्या काही महिन्यांत, महाराष्ट्र एटीएसने अल कायदा आणि इतर संघटनांशी संबंधित अनेक प्रकरणांमध्ये कारवाई केली आहे, ज्यामुळे सुरक्षा एजन्सी हाय अलर्टवर आहेत. यापूर्वी विविध जिल्ह्यांमध्ये अशाच प्रकारच्या कारवाया करण्यात आल्या असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. कोणतीही संशयास्पद हालचाल खपवून घेतली जाणार नाही आणि राज्यात शांतता राखण्यासाठी कडक उपाययोजना केल्या जात आहेत. ही घटना महाशिवरात्रीच्या दिवशी घडली, ज्या दिवशी देशभरात धार्मिक कार्यक्रम होत होते, परंतु सुरक्षा दलांनी या कारवाईबाबत अधिक सतर्कता बाळगली.

## डोंबिवलीत पहाटे भीषण आग, बेसमेंट पार्किंगमध्ये २९ दुचाकी जळून खाक; पाच जण जखमी

**तभा वृत्तसेवा**

**डोंबिवली:, दि. १५ फेब्रुवारी :** डोंबिवली पूर्वेतील चेडा नगर परिसरात पहाटे भीषण आग लागल्याची घटना घडली. रविकिरण सोसायटीतील राज अपार्टमेंट, जय भारत स्कूलजवळील बेसमेंट पार्किंगमध्ये पहाटे सुमारे ४.१५ वाजता अचानक आग लागली. या आगीत पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या एकूण २९ दुचाकी पूर्णपणे जळून खाक झाल्या.

आग लागल्यानंतर काही मिनिटांतच धुराचा प्रचंड लोट इमारतीत पसरला. यामुळे झोपेत असलेले रहिवासी घाबरून उठले आणि भीतीच्या वातावरणात इमारतीबाहेर धाव घेतली. आगीचा भडका उडाल्याने पाच जण किरकोळ जखमी झाले असून, त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती मिळते.

# पंतप्रधान तारिक रहमान यांच्या शपथविधी सोहळ्यासाठी पंतप्रधान मोदींना निमंत्रण

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** शेख हसीना यांच्या हकालपट्टीनंतर बांगलादेशात झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत दणदणीत विजय मिळवल्यानंतर, नवनिर्वाचित पंतप्रधान तारिक रहमान यांच्या शपथविधी सोहळ्यासाठी बांगलादेशने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आमंत्रित केले आहे.



बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचे नेते आणि माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे पुत्र तारिक रहमान १७ फेब्रुवारी रोजी पंतप्रधानपदाची शपथ घेणार आहेत. भारताने अद्याप अधिकृतपणे निमंत्रण मिळाल्याची पुष्टी केलेली नाही. दोन्ही देश द्विपक्षीय संबंध नव्याने प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत असताना, पंतप्रधान मोदी या सोहळ्याला उपस्थित राहणार का, याबाबतचा निर्णय अद्याप प्रलंबित आहे. दरम्यान, पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ ढाका येथील या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मुहम्मद युनूस यांनी एकूण १३ देशांना निमंत्रण दिले आहे. यामध्ये भारत, चीन, सौदी अरेबिया, पाकिस्तान, तुर्की, संयुक्त अरब अमिराती, कतार, मलेशिया, ब्रुनेई, श्रीलंका, नेपाळ, मालदीव आणि भूतान यांचा समावेश आहे.

१७ वर्षे लंडनमध्ये घालवल्यानंतर तारिक रहमान बांगलादेशचे नवे नेते म्हणून समोर आले आहेत.

## मंत्रालयातील लाच प्रकरणानं मंत्री नरहरी झिरवळ अडचणीत?


**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १५ फेब्रुवारी :**अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कार्यालयात लिपिकाला लाच घेताना पकडल्यानंतर आता अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री नरहरी झिरवळ यांनी विभागातील दक्षता पथकाला चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. लाचखोर लिपीक राजेंद्र ढेरंगे याची चौकशी करून बंद लिफाफ्यात त्याचा वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश झिरवाळ यांनी दिले आहेत.

नरहरी झिरवाळ यांनी लाचखोर ढेरंगे याची विभागातील प्रतिनियुक्ती रद्द करून पुन्हा अन्न व नागरी पुरवठा विभागात पुन्हा पाठविण्याची विनंती सामान्य प्रशासन विभागाला केल्याची माहिती समोर आली आहे.

विभागातील लिपीक ढेरंगे याला गुरुवारी ३५ हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले होते. ढेरंगे याच्या अटकेनंतर विभागाचे मंत्री नरहरी झिरवळ यांच्यावर टीकेची झोड उठली असून त्यांच्यावर मोठ्या प्रमाणावर टीका करण्यात आली होती, त्याचबरोबर राजीनामा देण्याचा दबाव टाकण्यात येत आहे.

# केदारनाथचे द्वार २२ एप्रिलला उघडणार; अक्षय तृतीयेपासून चारधाम यात्रेला प्रारंभ



**डेहराडून/वृत्तसंस्था :** उत्तराखंडमधील प्रसिद्ध केदारनाथ मंदिराचे दरवाजे भाविकांसाठी यावर्षी २२ एप्रिल रोजी उघडले जाणार आहेत. हिवाळ्यामुळे गेल्या सहा महिन्यांपासून बंद असलेले हे मंदिर पुन्हा एकदा भक्तांच्या जयघोषाने दुमदुमणार असल्याची माहिती मंदिर समितीच्या अधिकाऱ्यांनी रविवारी दिली. महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर यात्रेचा मुहूर्त निश्चित करण्यात आला.

श्री बद्रीनाथ-केदारनाथ मंदिर समितीचे जनसंपर्क अधिकारी हरीश गौर यांनी सांगितले की, भगवान केदारनाथांचे हिवाळी वास्तव्य असलेल्या ओंकारेश्र्वर मंदिरात हा निर्णय घेण्यात आला. हिंदू पंचांगानुसार गणना करून मंदिर उघडण्याची वेळ निश्चित केली. १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या केदारनाथ मंदिराचे कपाट २२ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता उघडले जातील. दरम्यान, या सोहळ्यासाठी ओंकारेश्र्वर मंदिर साडेनऊ क्विंटल फुलांनी सजवण्यात आले होते. यावेळी केदारनाथ मंदिराचे मुख्य पुजारी रावल भीमाशंकर लिंग, आमदार आशा नौटियाल, मंदिर समितीचे अध्यक्ष हेमंत द्विवेदी यांच्यासह शेकडो भाविक उपस्थित होते. भाविकांनी 'जय बाबा केदार'चा जयघोष करत परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण केले होते.

केदारनाथच्या तारखेसह गढवाल हिमालयातील वार्षिक चारधाम यात्रेचे संपूर्ण वेळापत्रक आता स्पष्ट झाले असून ते पुढील प्रमाणे...

गंगोत्री आणि यमुनोत्री धाम: अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर १९ एप्रिल रोजी या दोन्ही मंदिरांचे दरवाजे उघडतील.

केदारनाथ धाम: २२ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता भाविकांसाठी प्रवेश सुरू होईल.

बद्रीनाथ धाम: २३ एप्रिल रोजी बद्रीविशालचे दर्शन सुरू होईल.

## भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य : मुख्यमंत्री धामी

चक्रपूर येथील वनखंडी महादेव मंदिरात जलाभिषेक केल्यानंतर मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, २२ एप्रिलपासून केदारनाथ यात्रा सुरू होत असून प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. देवभूमी उत्तराखंडमध्ये येणाऱ्या प्रत्येक भाविकाची सुरक्षा सुनिश्चित करणे ही आमची प्राथमिकता आहे. गेल्या काही वर्षांत शिवभक्तांच्या संख्येत मोठी वाढ होत असल्याचे नमूद करत मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले की, वाढती गर्दी लक्षात घेता सुरक्षित आणि सुलभ दर्शनासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे.

# नागपूर विभागात २०४७ पर्यंत ९ लाख रोजगार, सव्वा पाच लाख कोटींच्या गुंतवणुकीचे लक्ष्य : मुख्यमंत्री

**तभा वृत्तसेवा**

**नागपूर, दि. १५ फेब्रुवारी :** नागपूर विभागाला २०४७ पर्यंत देशात अग्रगण्य औद्योगिक व सेवा केंद्र म्हणून उभारण्याचा महत्वाकांक्षी आराखडा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केला. त्यानुसार, 'विकसित नागपूर २०४७ शाश्र्वत विकास योजना अंतर्गत तब्बल ५.२५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यातील ६५ ले ७५ टक्के निधी हा खासगी क्षेत्रातून उभारला जाणार असून यामुळे नऊ लाखांहून अधिक रोजगार निर्मितीची अपेक्षा आहे.

महाराष्ट्र इन्स्टिट्युशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) संस्थेच्यावतीने नागपूर विभागाच्या शास्वत विकासाच्या रणनीतीवर आधारित कार्यशाळेच्या समारोप निमित्ताने मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी जिआयएस मित्रा आपचे उद्घाटन आणि तीन एमओयू करण्यात आले.



**'विदर्भातील पर्यटनाला नवी दिशा'**

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प आणि पेंच व्याघ्र प्रकल्प आधारे वाघ संवर्धन आणि इको टुरिझम सर्किट विकसित केले जाईल. बोर, गोसीखुर्द, रामटेक व खिंडसी परिसराचा विकास केला जाईल. वर्धा येथील सेवाग्राम आश्रम केंद्रस्थानी ठेवून पर्यटन सर्किट उभारण्याची मनिषा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या मिओ ओका, मित्राचे मुख्य कार्यकारी अध्यक्ष प्रवीण परदेशी, विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी प्रामुख्याने उपस्थित होते.

सद्यस्थितीत नागपुरात १० ते १२ हजार कोटी रुपयांची खासगी गुंतवणूक प्रत्यक्ष उभारणी प्रक्रियेत आहे. १.८ लाख कोटीचे प्रस्ताव प्रक्रियेत तर उवरित २.७ लाख कोटी रुपये पुढील काळात उभारले जाणार आहेत. पुढील दहा वर्षांसाठी ग्रीन अँड झिलियंट इकोसिस्टम' अंतर्गत ३५ हजार कोटीच्या गुंतवणुकीचा आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यापैकी ७.६ हजार कोटींचे प्रकल्प सुरू असून ५.२ हजार कोटीची गुंतवणूक जाहीर करण्यात आली आहे.

विदर्भात तांबे, लिथियम, पॅलेडियम टांगस्टन अशा महत्त्वाच्या खनिजांचे प्रकल्प उभारले जाणार आहेत. गडचिरोली जिल्ह्यात सुमारे १७८ दशलक्ष टन लोखंड धातू साठा असून २५ दशलक्ष टन वार्षिक क्षमतेच्या एकात्मिक स्टील प्रकल्पाचाही विचार सुरू आहे. भंडारा घाटीटोला वरघाट पट्ट्यात दुर्मिळ खनिज साठ्याची नोंद झाली असून भू भौतिकीय सर्व्हेक्षणाद्वारे शोध व विकास केला जाणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### व्हॅलेंटाईन विशेष: 'रीत'मुळे प्रेमाचा नवा अर्थ समजला - आयुषी खुराणा

**छत्रपती संभाजीनगर :** जाने अनजाने हम मिले या मालिकेत 'रीत'ची भूमिका साकारताना अभिनेत्री आयुषी खुराणाला प्रेम आणि वैवाहिक नात्यांचा अधिक सखोल अर्थ उमगल्याचे तिने सांगितले. मालिकेच्या प्रसारणानंतर अवघ्या महिन्यातच तिचा विवाह सूरज कक्कर यांच्याशी झाला. ऑन-स्क्रीन अनुभव आणि वास्तव आयुष्य यामध्ये साम्य जाणवल्याचे ती नमूद करते. प्रेम म्हणजे मोठ्या घोषणांपेक्षा संयम, समजूतदारपणा, तडजोड आणि दररोज जोडीदाराची निवड करणे, हीच खरी व्याख्या असल्याचे ती स्पष्ट करते. सध्या मालिकेत रीतसमोर कौटुंबिक आव्हाने उभी ठाकली असून प्रेक्षकांची उत्सुकता वाढली आहे. ही मालिका दररोज रात्री १०:३० वाजता झी टीव्हीवर प्रसारित होते.

### क्रोमा समर सेलमध्ये एसी आणि प्रीमियम टीव्हीवर मिळवा ७१% पर्यंतची भरघोस सूट!

**छत्रपती संभाजीनगर :** भारतातील आघाडीची ओम्नी-चॅनेल इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर कंपनी आणि टाटा समुहातील एक सदस्य, क्रोमा ने 'क्रोमा समर सेल २०२६' ची घोषणा केली आहे. उन्हाळ्याची चाहुल लागायला सुरुवात झाली आहे, त्यासाठीच क्रोमाने आपल्या ग्राहकांसाठी कूलिंग सोल्यूशन्स आणि दैनंदिन वापराच्या टेक क्सेसरीजवर शानदार डील्स आणल्या आहेत. हा सेल देशभरातील क्रोमा स्टोअर्समध्ये २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सुरू राहणार असून यामध्ये निवडक उत्पादनांवर विशेष सवलती, कॅटेगरी ऑफर्स आणि मर्यादित कालावधीसाठीच्या ऑफर्स दिल्या जात आहेत. यासोबतच, पार्टनर बँक किंवा फायनान्स अटींच्या अधीन राहून कॅशबॅक आणि सुलभ ईएमआयचे पर्यायही उपलब्ध आहेत. उत्पादनांच्या किमती आणि ऑफर्स ब्रँड, मॉडेल, स्टोअर, शहर आणि उपलब्धतेनुसार बदलू शकतात. याव्यतिरिक्त, एचडीएफसी टाटा नेउ क्रेडिट कार्ड वापरणारे ग्राहक निवडक उत्पादनांवर १०% पर्यंत सवलतीचा आनंद घेऊ शकतात.

### रॉयल स्टॅगकडून रोहित शर्मा आणि पॅडी अपटोन सोबत आरएस कोडचा खुलासा!

**छत्रपती संभाजीनगर :** क्रिकेटचा उत्साह शिगेला असताना, सीग्राम्स रॉयल स्टॅग पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटरने रॉयल स्टॅग कोड ऑफ लार्ज (आरएस कोड) हा अभिनव, डेटा-आधारित उपक्रम ब्रँड ॲम्बेसेडर आणि भारतीय संघाचा माजी कर्णधार रोहित शर्मा तसेच मेंटल कंडिशनिंग प्रशिक्षक पॅडी अपटोन यांच्या सहकार्याने सादर केला आहे, हा उपक्रम केवळ यश साजरे करण्यापुरता मर्यादित नसून, त्यामागील सूत्र उलगडण्याचा प्रयत्न आहे. रोहित शर्मा, दोन आईसीसी टी २० वर्ल्ड कप जिंकणारा एकमेव भारतीय खेळाडू, निर्भीड व्यक्तिमत्व आणि यशाचे प्रतीक आहे - स्वतःच्या पद्धतीने, प्रामाणिकपणे आणि रॉयल स्टॅगच्या 'लिव्हिंग इट लार्ज' तत्त्वज्ञानाशी पूर्णपणे सुसंगत असा जीवनमार्ग जगणारा आहे.

### यशस्वी बी२बी बैठका आयोजित केल्या

**पुणे :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर (मॅकसिया) आणि शारजाह एअरपोर्ट इंटरनॅशनल फ्री झोन सैफ  झोन), शारजाह, युएई सरकार यांच्या सहकार्याने, फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (फिक्की) ने युएई मार्फत जागतिक बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्यासाठी भारतीय उद्योगांना पाठिंबा देण्यासाठी पुण्यात बी२बी बैठकांची एक केंद्रित मालिका यशस्वीरित्या आयोजित केली.बैठकींमध्ये मध्य पूर्व, आफ्रिका, मध्य आशिया आणि रशियामधील व्यापार आणि गुंतवणूकीच्या संधींवर प्रकाश टाकण्यात आला. सहभागींना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ विस्तार आणि निर्यात आणि सीमापार व्यवसाय ऑपरेशन्स वाढविण्यासाठी भारत-युएई व्यापक आर्थिक भागीदारी करार ((सीईपीए) चा प्रभावीपणे वापर कसा करायचा याबद्दल अंतर्दृष्टी देखील मिळाली.

### २० ते २२ फेब्रुवारीदरम्यान साहित्योत्सव; प्रा. डॉ. बाळकृष्ण कवठेकर यांना जीवनगौरव

**छत्रपती संभाजीनगर :** अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्यभारती व स. भु. शिक्षण संस्थेतर्फे २०, २१ व २२ फेब्रुवारी रोजी साहित्योत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. जागर प्रतिभेचा, युवा मनाचा ही यंदाची थीम असून ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. बाळकृष्ण कवठेकर यांना साहित्यभारती जीवनगौरव पुरस्कार प्रदान केला जाणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष मंत्री अतुल सावे यांनी दिली. या वेळी डॉ. श्रीरंग देशपांडे, शशिकांत घासकडबी, प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर, प्रा. डॉ. सर्जेराव जिगे, आर्कि. डॉ. अनिरुद्ध नाईक, डॉ. विकास कापरे उपस्थित होते. २० फेब्रुवारीला बाबा भांड व प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे यांच्या उपस्थितीत ग्रंथदिंडी होणार असून, श्रीकांत उमरीकर लिखित कार्यक्रम सादर होईल. २२ फेब्रुवारीला अभिराम भडकमकर यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. विविध परिसंवाद, नाट्यछटा, कवीसंमेलन, अभिरूप न्यायालय आणि महाराष्ट्राची लोकधारा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. समारोपावेळी २१ हजार रुपये रोख व सन्मानपत्रासह जीवनगौरव प्रदान केला जाईल.

### कुसुमताई वाडेकर यांचे निधन



सोयगाव : आमराई येथील रहिवासी कुसुमताई रघुनाथराव वाडेकर (वय.७५) यांचे दि.१४ शनिवार रोजी रात्री ७:५५ वाजता निधन झाले.त्यांचेवर दि.१५ रविवार रोजी दुपारी १:०० वा.त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्र्चात दोन मुले,एक मुलगी,सुना,नातवंडे असा परिवार आहे.प्रसिद्ध मुद्रांक विक्रेता संजय वाडेकर यांच्या त्या मातोश्री तर कृषीभूषण शेतकरी अरुण सोहनी यांच्या त्या आत्या होत.

# एमजीएममध्ये भौतिकशास्त्र विषयावर राज्यस्तरीय अधिवेशनाचे उद्‌घाटन संपन्न

## अधिवेशनात देशभरातील अभ्यासकांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १५ फेब्रुवारी :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ बेसिक अँड अप्लाईड सायन्सेस आणि दि इंडियन असोसिएशन ऑफ फिजिक्स टीचर्स (आयएपीटी) आरसी-०८ व सब आरसी-०८ एफ (मराठवाडा विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'आयएपीटी महाराष्ट्र स्टेट कन्व्हेन्शन २०२६' या राज्यस्तरीय अधिवेशनाचे उद्घाटन आज विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाले.

या अधिवेशनाच्या उद्घाटन सोहळ्यास विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांच्यासह बार्क-यूजीसी-डीएई केंद्राचे संचालक डॉ.पी.डी.बाबू, आयएपीटी महाराष्ट्र प्रादेशिक परिषदेचे अध्यक्ष प्रा.महेश शेट्टी, डॉ.एम.एस.जोगड, प्रो. जी.के.बिचले, अधिष्ठाता डॉ.प्राप्ती देशमुख, एमेरिटस प्राध्यापक डॉ.के.एम. जाधव, प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी व विविध शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



'रिव्होल्यूशनायझिंग फिजिक्स एज्युकेशन : इंटिग्रेटिंग क्वांटम टेक्नॉलॉजीज अँड आर्टिफिशियल इंटेलिजन्स' ही या अधिवेशनाची मुख्य संकल्पना असून आधुनिक भौतिकशास्त्र शिक्षणातील बदलते प्रवाह, कृत्रिम बुद्धिमत्ता व क्वांटम तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव, संशोधनातील नवे क्षितिज आणि भविष्यातील शैक्षणिक दिशा यावर सखोल मंथन या परिषदेत होणार आहे.

ईसी मेंबर प्रो. डॉ. शिवानंद मस्ती यांनी विद्यार्थ्यांसाठी तरंग, प्रकाश, बल, दाब, चुंबकत्व अशा विविध वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित प्रयोग सादर केले. त्यांनी सोप्या भाषेत आणि रोचक पद्धतीने प्रयोग दाखवून विद्यार्थ्यांना विज्ञानातील तत्त्वे समजावून सांगण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते द्वीपप्रज्वलनाने झाली. अधिष्ठाता डॉ. प्राप्ती देशमुख यांनी प्रास्ताविक करत अधिवेशनाच्या उद्दिष्टांची माहिती दिली. अधिवेशनाच्या माहिती पुस्तिकेचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. अधिवेशनात आयएपीटी 'अन्वेषिका/ ज्योत'मराठवाडा विभागात ठेवली असून ती संपूर्ण भारतभरातील विविध संस्थांमध्ये जाणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आंचल कपूर आणि नंदिनी सिंग यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.क्रांती झाकडे यांनी केले. या अधिवेशनाच्या उद्घाटन सोहळ्यात मान्यवरांनी व्यक्त केलेले विचार खालीलप्रमाणे आहेत :

कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ : एमजीएम विद्यापीठात बी.एस्सी., एम.एस्सी., पीएच.डी. तसेच क्वांटम फिजिक्ससारख्या आधुनिक विषयांचे अध्यापन केले जाते. भौतिकशास्त्राच्या माध्यमातून विद्यार्थी 'युनिक इनोव्हेटर्स' म्हणून घडत आहेत. या अधिवेशनामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडेल आणि संशोधनासाठी नवी दिशा मिळेल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रा. महेश शेट्टी : कृत्रिम बुद्धिमत्ता आज विविध माध्यमांतून आपल्याला माहिती पुरवत आहे. आपण एआयचा वापर केला किंवा नाही केला तरी एआय आपल्या जीवनाचा भाग बनला आहे. त्यामुळे तरुण संशोधकांनी अशा परिषदांमधून कल्पनांची देवाणघेवाण करून नव्या संकल्पना आत्मसात कराव्यात आणि संशोधन क्षेत्रात नावीन्यपूर्ण वाटा चोखाळाव्यात.

प्रो.जी.के.बिचले : छत्रपती संभाजीनगरमध्ये आयएपीटीची सुरुवात शिक्षण आणि विद्यार्थ्यांमध्ये भौतिकशास्त्राविषयी आवड निर्माण करण्यासाठी झाली. विद्यार्थ्यांनी आपल्या विषयातील ज्ञान अधिक व्यापक करण्यासाठी अशा व्यासपीठांचा लाभ घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले. या राज्यस्तरीय अधिवेशनामुळे भौतिकशास्त्र विषयातील शिक्षक, संशोधक आणि विद्यार्थी यांना एकत्र येऊन नव्या तंत्रज्ञानाच्या पार्श्र्वभूमीवर विचारमंथन करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. आगामी सत्रांमध्ये विविध तज्ज्ञांची व्याख्याने, संशोधन सादरीकरणे आणि चर्चासत्रे आयोजित करण्यात आली आहेत.

## माणिकराव पालोदकर विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा**

**फर्दापूर, दि. १५ फेब्रुवारी :** माणिकराव पालोदकर विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ आयोजित करण्यात आला.

फर्दापूर माणिकराव पालोदकर विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ आयोजित करण्यात आला यावेळी दहावीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते



तसेच माणिकराव पालोदकर विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच माणिकराव पालोदकर विद्यालयाचे मुख्याध्यापक के आर पाटील सर यांनी विद्यार्थी यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तसेच सांगितले की भविष्यात तुम्ही तुमचे नाव तसेच आई वडील आणि शिक्षक शिक्षिका यांचे हि नाव चांगल्याप्रकारे निघेल अशी अपेक्षा करतो पुढील शिक्षण हे चांगल्याप्रकारे घ्या आणि भविष्यात स्वस्त ची तसेच नागरिकांची सेवा चांगल्याप्रकारे करा असे हि सरांनी सांगितले यावेळी शिक्षक शिक्षिका तसेच शाळेचे विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच यांच्या साठी भोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता

## वेरूळच्या श्री. घृष्णेश्वराचे लाखो भाविकांनी घेतले दर्शन



**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद, १५ फेब्रुवारी :** घृष्णेश्र्वर मंदिर परिसरहर हर महादेव आणि जय शिव शंकरच्या घोषणांनी  दुमदुमून गेला श्री क्षेत्र वेरूळ या ठिकाणच्या बारावे ज्योतिर्लिंग, श्री घृष्णेश्र्वर महादेवाच्या चरणी लीन होण्यासाठी अनेक ठिकाणचे साधुसंत महंत सह. देशभरा तुंन लाखो भक्तांची  शनिवारी सायंकाळपासूनच वेरूळ नगरीत प्रचंड गर्दी होण्यास सुरुवात , झाली होती मंदिर देवस्थानच्या वतीने येणाऱ्या भाविकांसाठी दर्शन व्यवस्थित  होण्यासाठी नियोजन करण्यात आले होते.



## महाशिवरात्री पर्वाव प्राचीन सिद्धेश्वर मंदिरात गर्दी

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. १५ फेब्रुवारी :** पंचक्रोशीतील ग्रामदैवत असलेले गोदावरी तीरावरील प्राचीन सिद्धेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्री निमित्य शिव दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली असून त्या पाठोपाठ श्रीक्षेत्रातील गाढश्वर, दोलेश्वर, तारकेश्वर, इंद्रेश्वर, गंगेश्वर, नागेश्वर, पिंपळेश्वर महादेव मंदिरात शिवनामाचा गजर सुरु होता.

दक्षिण काशीतील पैठण येथील सिद्धेश्वरी तीर्थावलीवर संत ज्ञानेश्वर महाराजांनी सुरू केलेल्या शिवरात्री महोत्सवाला यंदा ७३८ वर्ष पूर्ण झाली आहे. शिवरात्रीच्या महापर्वावर मराठवाड्याच्या काण्याकोपऱ्यातून रूढी, परंपरा व प्रथेनुसार ब्रह्मदेवाने स्थापित केलेल्या शिवलिंग पिंडीचे दर्शन घेण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने लोटला होता. संत ज्ञानेश्वराने शुद्धिपत्र मिळाल्यानंतर सिद्धेश्वर तीर्थावळीवर १२८७ ला दोन वर्ष आठ महिने मुक्काम ठेवला होता. तेव्हापासून सिद्धेश्वर तीर्थवली वर महाशिवरात्री पर्वावर यात्रा भरू लागली. सिद्धेश्वर महादेव भक्त व भाविकांच्या पुढाकाराने सिद्धेश्वर तीर्थावळीचा विकास होत आहे. पैठण ही भूमी अतिशय प्राचीन असून या शहरात अनेक प्राचीन महादेवाची मंदिरे आहेत. गाढेश्वर, दोलेश्वर, गंगेश्वर, सोमेश्वर,गोदेश्वर, पिंपळेश्वर हरहरश्वर, कलिकेश्वर, रामेश्वर, तारकेश्वर, इंद्रेश्वर नागेश्वर व बाळलिंगेश्वर आदि महादेवांच्या दर्शनासाठी शिवरात्री पर्वावर भाविकांनी गर्दी केली होती. जैनपुरा पैठण येथे व गोदाकाठच्या रामतीर्थावर व पिंपळेश्वर तीर्थावलीवर ही सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सिद्धेश्वर महादेव मंदिरात फौजदार जाधव, आशिष पवार, रमेश खांडेकर, मुकुंद राऊत, यश परळकर, शिवम कुडके, ओम कुडके, भानुदास वायाचल, गणेश जाधव, मंगेश पानपाट, भागवत रोकडे, विशाल जाधव, सागर पाटील, गणेश सवणे,बबलू नरके, ललित कायस्थ,दिनेश माळवे आदी भक्तांनी दर्शनसेवेसाठी परिश्रम घेतले.

## भगवती विद्यालयामधील दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन , दि. १५ फेब्रुवारी :** भागवती विद्यालय बिडकीन तालुका पैठण येथे इयत्ता दहावी च्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. प्रथम विद्येची देवता सरस्वती व पुण्यशोक अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित पैठणचे आद्य संस्थापक झारगड मामा यांच्या प्रतिमेचे पूजन प्रशालेचे मुख्याध्यापक रायभान रक्ते व प्रमुख पाहुणे बिडकीन शहराचे प्रथम नागरिक अशोकभाऊ धर्मे, उपसरपंच किरणभाऊ गुजर यांच्या हस्ते करण्यात आले.



यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीधर जऱ्हाड यांनी केले यानंतर पाहुण्यांचे स्वागत शाल श्रीफळ व पुष्पहार देऊन करण्यात आले. या निमित्ताने विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन केले मुख्याद्यापकांनी अध्यक्षीय भाषणात दहावीच्या विदयार्थ्यांना पुढील वाटचालीस प्रेरणा देऊन उत्तम नागरिक कसे व्हावे मार्गदर्शन केले. कार्क्रमाचे सूत्रसंचालन रामनाथ धनवे यांनी केले तर आभार कमलाकर काळे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विश्रांती सलगरे, सुनील पवार, अपासाहेब किसवे, सुभाष रांठोड, आशुतोष झारगड, पल्लवी नरवडे यांनी सहकार्य केले पसायदाना ने कार्यक्रकर्माची सांगता करण्यात आली.

# कॉपीमुक्त अभियानासाठी ठोस पावले उचला; विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १५ फेब्रुवारी :** छत्रपती संभाजीनगर विभागातील काही परीक्षा केंद्रांवर घडलेल्या गैरप्रकारांच्या बातम्या राज्यात पोहोचल्या असून, यामुळे विभागाच्या प्रतिमेला धक्का बसला आहे. त्यामुळे यापुढे अशा घटना घडू नयेत, यासाठी सर्व यंत्रणांनी अधिक जबाबदारीने काम करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले.

दहावी व बारावी परीक्षांच्या पार्श्र्वभूमीवर विभागातील पोलीस उपमहानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर, नांदेड जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प., पोलीस अधिक्षक, विभागीय शिक्षण उपसंचालक, एसएससी बोर्डाचे अध्यक्ष व सचिव, तसेच शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांच्यासमवेत विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांनी आढावा बैठक घेतली.

बैठकीत काही केंद्रांवर कॉपी व गैरप्रकार झाल्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या घटनांमुळे वृत्तपत्रांमध्ये नकारात्मक बातम्या प्रसिद्ध झाल्याने विभागाच्या कामकाजात सुधारणा करण्याची गरज असल्याचे आयुक्तांनी नमूद केले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अंतर्गत होणाऱ्या परीक्षांमध्ये पारदर्शकता राखण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नियंत्रण कक्ष, भरारी पथके व निरीक्षण व्यवस्था अधिक मजबूत करण्याचे निर्देश आयुक्त पापळकर यांनी दिले.

बैठकीत सांगण्यात आले की, बीड जिल्ह्यात १०३ परीक्षा केंद्रांसाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष व १०३ पथके कार्यरत



करण्यात आली आहेत. तसेच सर्व केंद्रांवर नियमित तपासणी केली जात आहे.

छत्रपती संभाजीनगर व बीड येथील काही शिक्षकांवर निलंबनाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली असून, संबंधित संस्थेच्या दोषी शिक्षकांविरुद्ध निलंबनाची कारवाई करण्याबाबत कळविले असल्याचे संबंधित शिक्षणाधिकारी यांनी बैठकीत सांगितले.

यापुढे कोणत्याही केंद्रावर गैरप्रकार झाल्यास संबंधित संस्थेतील दोषींविरुद्धही गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा देण्यात आला. केवळ शिक्षकांवरच नव्हे, तर सर्व संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, असे आयुक्तांनी सांगितले.

कॉपीमुक्त अभियानासाठी करत असलेल्या कार्यवाहीची माहिती जिल्हाधिकारी, नांदेड, लातूर, परभणी, जालना यांनी बैठकी दरम्यान दिली.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार बेडसे यांनी परीक्षा या कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याची अपेक्षा व्यक्त केली. संवेदनशील परीक्षा केंद्रावर बैठेपथक नियुक्त करुन त्यांचा नियमित आढावा घेण्याचे निर्देश देण्यात आले.

पोलीस प्रशासनाने गैरप्रकार घडलेल्या ठिकाणी गुन्हे दाखल करण्याबाबत त्वरेने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

बैठकीत लातूर जिल्हाधिकाऱ्यांनी मांडलेले मुद्देही महत्त्वाचे असल्याचे नमूद करण्यात आले. इतर जिल्ह्यांतील अडचणींचाही आढावा घेण्यात आला.

विद्यार्थ्यांचे भवितव्य लक्षात घेता परीक्षा कॉपीमुक्त, शांत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडणे आवश्यक आहे. सर्व अधिकारी, कर्मचारी व संस्था चालकांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले. योग्य नियोजन व कठोर अंमलबजावणी झाल्यास आगामी दहावी व बारावीच्या परीक्षा सुरळीत पार पडतील, असा विश्र्वास आयुक्त पापळकर यांनी व्यक्त केला.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### सोनपेठ नगर परिषदेत आज जनता दरबार

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** रमाई आवास घरकुल योजना व प्रधानमंत्री आवास घरकुल योजना संदर्भात मंजूर झालेल्या घरकुल लाभार्थ्यांची उर्वरित रक्कम देण्यासाठी व घरकुल योजनेतील लाभार्थ्यांच्या विविध समस्या निवारण साठी सोमवार दि. १६ फेब्रुवारी रोजी नगरपरिषद कार्यालय येथे सकाळी १० वाजता जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे, या जनता दरबार मध्ये घरकुला संदर्भात विविध समस्यांचे निवारण करण्यात येणार असून यासाठी लाभार्थ्यांनी घरकुलाची कागदपत्रे घेऊन नगर परिषद येथे उपस्थित राहावे असे आवाहन नगराध्यक्ष परमेश्वर कदम व मुख्याधिकारी यांनी केले आहे.

### परभणी महानगरपालिकेतर्फे शिवजयंती उत्सवाचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी:** परभणी शहर महानगरपालिका यांच्या वतीने



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजता शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ संपन्न होणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने होईल. त्यानंतर शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी जिमनॅस्टीक, तलवारबाजी व मल्लखांब यांसारख्या पारंपरिक आणि साहसी क्रीडाप्रकारांचे आकर्षक सादरीकरण होणार आहे. तसेच शिवरायांचा पराक्रम आणि स्वराज्याची गाथा उलगडणारा पोवाडा व शिवगीत सादर करण्यात येईल. हा संपूर्ण कार्यक्रम सहा जणांच्या संचामार्फत सादर केला जाणार आहे. शुभम मस्के, धनश्री आडे, गाऊराज भालेराव, अमित गायकवाड आणि मुन्ना मोरे आदी कलावंत शिवगीत व पोवाड्याचे सादरीकरण करणार आहेत. या कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक व क्रीडा विभागाच्यावतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमास शहरातील सर्व शिवप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख, आयुक्त नितीन नार्वेकर आणि उपायुक्त प्रज्ञावंत कांबळे यांनी केले आहे.

### राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत २१ विद्यार्थ्यांवर 'टंग टाय' शस्त्रक्रिया

**सेलू,/प्रतिनिधी:** वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय हरबडे यांच्या मार्गदर्शनाखाली उप जिल्हा रुग्णालय सेलू येथे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम



अंतर्गत दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात जिभेचा दोष (बोलताना अडखळणे/टंग टाय) असलेल्या एकूण २१ विद्यार्थ्यांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत शाळांमधील विद्यार्थ्यांची नियमित तपासणी केली जाते. तपासणीत दोष आढळलेल्या विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार औषधोपचार व शस्त्रक्रिया करून उपचार दिले जातात. अलीकडील तपासणीत ३४ विद्यार्थ्यांना जिभेचा दोष आढळून आला होता. त्यापैकी २१ विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आली असून उर्वरित १३ विद्यार्थ्यांना स्पीच थेरपीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या सर्व शस्त्रक्रिया कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. तांबोळी (सामान्य रुग्णालय, परभणी) यांनी यशस्वीरीत्या पार पाडल्या. यावेळी गटविकास अधिकारी उदय जाधव, गटशिक्षण अधिकारी श्री वाघमारे उपस्थित होते.

हे शिबिर यशस्वी होण्यासाठी सर्व मुख्याध्यापक तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत कार्यरत डॉ. गणेश मुळे, डॉ. आलेश बुरेवार, डॉ. जाधव मॅडम आणि उपजिल्हा रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या बोलण्यात सुधारणा होऊन त्यांच्या शैक्षणिक व व्यक्तिमत्त्व विकासाला मोठी मदत होणार आहे.

### परभणीत महानिर्यात -इग्राईट कन्व्हेंशन एकदिवसशीय कार्यशाळेचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी:** उद्योजकांना सर्व योजनांची माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध



व्हावी, यासाठी सर्व विभागांच्या सहकार्याने परभणी जिल्ह्यातील सर्व उद्योजकांसाठी महानिर्यात-इग्राईट कन्व्हेंशन-२०२६ एकदिवसीय कार्यशाळा मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यशाळेसाठी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटक, निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नवउद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह, औद्योगिक वसाहती, शेतकरी सहकारी संस्था व उत्पादक, प्रक्रिया उद्योग केंद्रे, तसेच राज्य शासन व संबंधित उपक्रमांचे अधिकारी, जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य, निर्यातविषयक कामकाज करणारे घटक, संशोधक व बँक प्रतिनिधी यांना आमंत्रित करण्यात आले आहे.

कार्यशाळेत पुणे येथील डीजीएफटीचे महासंचालक, अपेडा पुणे, एमएसएमईचे सहायक संचालक, मैत्री कक्षाचे अधिकारी, इंडियन पोस्टचे अधिकारी, अधीक्षकीय कृषी अधिकारी, चे निर्यात वित्तपुरवठा व्यवस्थापक आदी तज्ज्ञांकडून निर्यात, उद्योगविकास व शासकीय योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या कार्यशाळेसाठी जास्तीत जास्त उद्योजकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल बळे यांनी केले आहे.

राज्याच्या आर्थिक विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्रावर अधिक भर देऊन त्यांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे, राज्यात उद्योजकीय वातावरण अधिक व्यापक करून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण करणे, एक जिल्हा एक उत्पादन उपक्रम तसेच निर्यातवृद्धीस चालना देण्याच्या उद्देशाने राज्य व केंद्र शासनाच्या विविध विभागांमार्फत अनेक योजना व उपक्रम राबविण्यात येत आहेत.

# कमी खर्चात आधिक उत्पन्न देणाऱ्या रेशीम शेतीकडे वळा-जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

**परभणी,/प्रतिनिधी-:** जिल्ह्यात ''सिल्क ॲण्ड मिल्क'' ही अभिनव संकल्पना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने महारेशीम अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी रेशीम शेतीचा अवलंब करावा, असे आवाहन संजयसिंह चव्हाण यांनी केले. कमी पाण्यात आणि कोरडवाहू जमिनीतही यशस्वी ठरणाऱ्या या शेतीपद्धतीमुळे शेतकऱ्यांना स्थिर व नियमित उत्पन्नाचा मार्ग उपलब्ध होत आहे, असेही त्यांनी सांगितले.



परभणी जिल्हयात दि. ११ मार्च २०२६ पर्यंत महारेशीम अभियान राबविण्यात येणार आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या हस्ते आज रेशीम चित्ररथाला हिरवी झेंडी दाखवून अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.या अभियानाद्वारे शेतकऱ्यांना रेशीम शेतीचे महत्त्व, शासकीय योजना व अनुदानाची माहिती देण्यात येणार असून, जिल्ह्यात रेशीम उद्योगाला चालना देण्याचा उद्देश आहे.जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आयोजित या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपजिल्हाधिकारी (रोहयो) शोभा जाधव, जिल्हा रेशीम विकास अधिकारी गोविंद कदम, जिल्हा अग्रणी बँकेचे प्रतिनिधी श्री. कुलकण, जिल्हा अग्रणी बँकेचे व सिल्क मिल्क समन्वयक श्री. हटेकर, सहायक प्राध्यापक धनंजय माहोड व श्री. बोकन, श्री. भंडारे, क्षेत्र सहाय्यक श्री. मिसाळ, क्षेत्र सहाय्यक, श्री वागतकर, मनरेगा कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. तसेच प्रगतशील शेतकरी उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि.१२) झालेल्या जिल्हा वार्षिक योजनेच्या राज्यस्तरीय बैठकीत जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी पालकमंत्री मेघना बोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली परभणी जिल्ह्यात 'सिल्क अँड मिल्क' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली होती.या उपक्रमाच्या माध्यमातून रेशीम शेती आणि दुग्ध व्यवसायाला चालना देऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ करण्याचा मानस आहे. शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीसोबतच रेशीम शेतीकडे वळल्यास कमी खर्चात अधिक उत्पन्न मिळू शकते, असे नमूद केले.दरम्यान, परभणी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी 'सिल्क अँड मिल्क' उपक्रमाचा लाभ घ्यावा आणि आर्थिक स्वावलंबन साधावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले.महारेशीम अभियानाच्यानिमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात सिल्क अँड मिल्क'' या उपक्रमाबाबत आढावा बैठक आज घेण्यात आली. त्यावेळी जिल्हाधिकारी यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यांनी लवकरच प्रत्यक्ष शेतभेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधण्याची इच्छाही व्यक्त केली.शासनाच्या विविध अनुदान योजनांच्या माध्यमातून रेशीम शेतीसाठी भरीव आर्थिक सहाय्य, तांत्रिक मार्गदर्शन आणि बँक सहकार्य उपलब्ध करून दिले जात आहे. कमी पाण्यात, कोरडवाहू जमिनीत आणि कमी खर्चातही अधिक उत्पन्न देणारा हा पर्याय ठरत आहे. तुती लागवड, संगोपनासाठी प्रशिक्षण, तसेच ''सिल्क ॲण्ड मिल्क'' संकल्पनेअंतर्गत पशुधन सहाय्य यांचा लाभ घेऊन शेतकऱ्यांनी रेशीम शेतीकडे वळावे. स्थिर, नियमित आणि वाढते उत्पन्न मिळविण्यासाठी ही सुवर्णसंधी साधावी, असे जिल्हाधिकारी यांनी आवाहन केले.कमी पाण्यात आणि कोरडवाहू जमिनीतही रेशीम शेती यशस्वी होत असल्याचे शेतकऱ्यांनी यावेळी सांगितले. काही प्रगतशील शेतकरी एकरी ३ ते ३.५० लाख रुपयांपर्यंत उत्पन्न घेत असल्याची माहिती देण्यात आली. वर्षभरात ५ ते ६ संगोपन फेऱ्या घेऊन नियमित उत्पन्नाचा स्रोत निर्माण होत असल्याने अनेक शेतकरी पारंपरिक पिकांऐवजी रेशीम शेतीकडे वळत आहेत. परभणी जिल्ह्यात ''सिल्क ॲण्ड मिल्क'' ही अभिनव संकल्पना राबविण्यात येत आहे. जिल्हा अग्रणी बँकेच्या सहकार्याने तुती लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना अनुदानावर गाई व म्हशी देण्यात येतात. त्यामुळे दुग्ध व्यवसाय आणि रेशीम शेती यांचा संगम साधून उत्पन्नात लक्षणीय वाढ होत आहे. तुतीचा उरलेला पाला जनावरांसाठी तसेच कुक्कुटपालनासाठी उपयोगी पडत असल्याने खर्चात बचत होते. या योजनेत जिल्ह्यातील ११० शेतकऱ्यांची निवड करण्यात आली असून त्यांना ७ ते ८ लाख रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जात आहे.मनरेगा व पोखरा योजनेंतर्गतही शेतकऱ्यांना अनुदान मिळते. तुती लागवड १० ते १५ वर्षे टिकणारी असल्याने दीर्घकालीन स्थिर उत्पन्नाचा स्रोत निर्माण होतो. रेशीम उत्पादन पूर्णपणे सेंद्रिय पद्धतीने होत असल्याने जमिनीचा पोत सुधारतो आणि पर्यावरणपूरक शेतीला चालना मिळते. फॅशन उद्योगातील वाढत्या मागणीमुळे तुती, एरी, टसर (कोसा) आदी रेशीम प्रकारांना बाजारात चांगला दर मिळत आहे.जिल्हा रेशीम कार्यालयामार्फत तुती रेशीम योजना प्रभावीपणे राबविली जात आहे. महिनाभर चालणाऱ्या ''महारेशीम अभियान'' अंतर्गत तुती लागवड करणाऱ्या इच्छुक शेतकऱ्यांची नोंदणी केली जाते, तसेच त्यांना मार्गदर्शन, तांत्रिक सहाय्य आणि अनुदान योजनांची माहिती दिली जाते. रेशीम उद्योगाच्या विकासासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ येथे सातत्याने संशोधन सुरू असून ते प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी केंद्रीय रेशीम मंडळ कार्यरत आहे. त्यामुळे परभणी जिल्ह्यात रेशीम उद्योगासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि तांत्रिक पाठबळ उपलब्ध झाले आहे. वाढती बाजारपेठ, शासकीय अनुदान योजना आणि तांत्रिक मार्गदर्शन यांच्या जोरावर परभणी जिल्ह्यात रेशीम उद्योग आर्थिक प्रगतीचा नवा आणि शाश्वत मार्ग ठरत असून महारेशीम अभियानामुळे या क्षेत्राला अधिक बळ मिळणार असल्याचे चित्र आहे. महारेशीम अभियानामध्ये रेशीम नोंदणी करण्यासाठी जिल्हा रेशीम कार्यालयात पुढील मोबाईल नंबर वर संपर्क साधावा ९७६३६८९०३२आणि ८९७५६७४६४३,असे आवाहन श्री. कदम यांनी केले.

## सावंगी म्हाळसा गटाला जिल्हा परिषद अध्यक्षपदाची संधी ? ; लता वाकळे यांच्या नावाची जोरदार चर्चा

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी नुकतीच शांत झाली असून आता जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. परभणी जिल्हा तसेच जिंतूर तालुका येथे अनेक गट-गणांमध्ये चुरशीच्या लढती पाहायला मिळाल्या. जिंतूर तालुक्यातील दहा जिल्हा परिषद गटांपैकी सहा गटांवर भाजपने विजय मिळवत वर्चस्व सिद्ध केले, तर चार गट राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाकडे गेले. पंचायत समितीच्या २० गणांपैकी १४ गणांमध्ये भाजपची सरशी झाली. दरम्यान, जिल्हा परिषद अध्यक्षपदाचे आरक्षण अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी जाहीर झाले आहे. त्यामुळे अध्यक्षपदासाठी संभाव्य नावांबाबत राजकीय वर्तुळात चर्चा रंगल्या आहेत. जिंतूर विधानसभा मतदारसंघात पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढविण्यात आली होती. त्यांच्या मतदारसंघातील सावंगी म्हाळसा हा जिल्हा परिषद गट अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव होता.



या गटातून भाजपच्या लता विजयकुमार वाकळे यांनी तब्बल १ हजार ४६५ मताधिक्याने दणदणीत विजय मिळवला. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) च्या प्रस्थापित उमेदवाराचा पराभव करत राजकीय वर्तुळात लक्ष वेधले. त्यामुळे सावंगी म्हाळसा गटाला जिल्हा परिषद अध्यक्षपदाची संधी मिळू शकते, अशी चर्चा तालुक्यात रंगू लागली आहे.

लता वाकळे या अत्यंत सामान्य व गरीब कुटुंबातून राजकारणात पुढे आलेल्या उमेदवार म्हणून ओळखल्या जातात. मागील अनेक वर्षांपासून त्या पालकमंत्री बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहेत. कोणताही राजकीय वारसा नसतानाही त्यांनी मेहनतीच्या जोरावर विजय मिळवला असल्याने सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये त्यांच्या नावाला पाठिंबा वाढताना दिसत आहे.

आता अध्यक्षपदासाठी अंतिम निर्णय पक्षश्रेष्ठी आणि स्थानिक नेतृत्वाच्या चर्चेनंतर होणार असला,

तरी सावंगी म्हाळसा गटाच्या लता वाकळे यांच्या नावाची चर्चा वेगाने पुढे येत आहे. पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांचा त्यांच्यावर विश्वास कायम राहतो का आणि त्यांना अध्यक्षपदाची संधी मिळते का, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.



## श्री.संत सेवालाल महाराज यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**परभणी,/प्रतिनिधी:** श्री संत सेवालाल महाराज यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन करण्यात आले होते.



थोर समाजसुधारक, बंजारा समाजाचे आराध्य दैवत श्री संत सेवालाल महाराज यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली.

नायब तहसीलदार प्रशांत वाकोडकर यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी सहायक महसूल अधिकारी आबेदखॉ पठाण, महसूल सहायक ओमप्रकाश काळे, महसूल सहायक ज्ञानेश्वर भरकड, कर्मचारी दिलीप डहाळे, दत्तात्रय शहाणे आदी उपस्थित होते.

## सर्दी,खोकला तापाच्या रुग्णसंस्खेत झाली मोठी वाढ, थंड-उष्ण हवामानाचा आरोग्यावर परिणाम



**सोनपेठ,/प्रतिनिधी-** रात्रीची थंडी आणि दिवसाची उष्णता जाणवत असल्यामुळे, बदलत्या हवामानाचा थेट परिणाम मानवी नागरिकांच्या आरोग्यावर होत असल्याने सोनपेठ शहरासह तालुक्यात सर्दी, खोकला, ताप आणि श्वसन विकाराच्या रुग्णांत झपाट्याने वाढ होताना दिसत आहे. त्यामुळे शहरातील ग्रामीण रुग्णालयासह खाजगी दवाखान्यांमध्ये रुग्णांची वाढती गर्दी दिसून येत आहे.

थंड-उष्ण वातावरणामुळे व बदलत्या ऋतूमुळे व्हायरल इन्फेक्शन आणि ॲलर्जी याबरोबरच सर्दी, खोकला,कफ व तापीच्या आजाराने डोके वर काढले आहे. त्यामुळे नागरिकांच्या घशाचे विकार वाढले आहेत. त्यामध्ये लहान मुले व ज्येष्ठ नागरिक या आजारांची शिकार होताना जास्त प्रमाणात दिसून येत आहेत. सर्दी ताप व डोकेदुखी या आजाराने त्रस्त असणाऱ्या काही रुग्णांमध्ये डेंगू सदृश्य आजाराची लक्षणे दिसून येत आहेत. मात्र याबाबत आरोग्य विभागाने अद्याप पुष्टी केली नसल्याचे दिसून येते. या आजारांपासून आराम मिळण्यासाठी तालुका आरोग्य विभागाने शहरासह ग्रामीण भागामध्ये घरोघरी जाऊन अशा स्वयंसेविकामार्फत आजारी रुग्णांचा सर्वे करून त्यांना औषध गोळ्या पुरविण्याची गरज निर्माण झाली आहे. तसेच पाण्यातून होणाऱ्या आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी व पिण्याचे जलस्त्रोत्रांमध्ये निर्जंतुकीकरणासाठी ग्रामपंचायतींनी आवश्यक त्या उपाययोजना करणे गरजेचे आहे.

वातावरणातील बदलामुळे सर्दी खोकला आणि तापीसारखे आजार होत असतात.त्यासाठी नागरिकांनी खबरदारी म्हणून सरकारी दवाखाण्यासह नजिकचे उपकेंद्र व ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांकडे जाऊन वेळेत योग्य ते उपचार करुन घ्यावेत.तसेच सोनपेठ तालुक्यातील सर्वच गावांमधील आशा स्वयंसेविकां मार्फत आजारी रुग्णांचा शोध घेऊन त्यांना आजार मुक्त करण्यासाठी सोनपेठ तालुका आरोग्य विभाग तात्काळ योग्य त्या उपाययोजना करणार आहे.

## विद्यार्थ्यांचे परीक्षेतून आयुष्य घडते- प्रा. राहुल गिरी

**परभणी,/प्रतिनिधी:** धर्मापुरी येथील ज्ञानसाधना प्रतिष्ठान परभणी संचलित माध्यमिक विभागात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'परीक्षेला जाताना...!' या विशेष समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बोर्ड परीक्षेला सामोरे जाताना विद्यार्थ्यांची भीती दूर व्हावी आणि त्यांना मानसिक बळ मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा. किरण सोनटक्के होते. प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध व्याख्याते व समुपदेशक प्रा. राहुल गिरी उपस्थित होते. तसेच संस्थेच्या सचिव प्रा. सौ. शितल सोनटक्के, सर्व समन्वयक आणि विभागप्रमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्य गीताने झाली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. ज्ञानसाधना सूरसागर गीत संचाच्या वतीने मान्यवरांचे स्वरसुमनांनी स्वागत करण्यात आले. प्रास्ताविकात प्रा. सौ. शितल सोनटक्के यांनी दहावीच्या बोर्ड परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना योग्य दिशा व प्रेरणा मिळावी, यासाठी या समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. प्रमुख पाहुणे प्रा. राहुल गिरी यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना परीक्षेची भीती न बाळगता आत्मविश्वासाने आणि सकारात्मक दृष्टीकोनातून परीक्षेला सामोरे जाण्याचे आवाहन केले. आई-वडील व गुरुजनांचे संस्कार जपत सातत्यपूर्ण परिश्रम केल्यास यश निश्चित मिळते, असे त्यांनी सांगितले. ''परीक्षेतूनच आपले आयुष्य घडत असते,'' असे प्रतिपादन करून त्यांनी विद्यार्थ्यांना तणावमुक्त राहण्याचा संदेश दिला. अध्यक्षीय भाषणात प्रा. किरण सोनटक्के यांनी नियमित,




सातत्यपूर्ण आणि नियोजनबद्ध अभ्यास केल्यास घवघवीत यश मिळते, असा विश्वास व्यक्त केला व विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री पी. एस. खंदारे यांनी केले, तर समन्वयक श्री आर. जी. पोले यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व समन्वयक, विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

## रोखठोक

**दिनेश गुणे**

# गरज, नाईलाज की अपरिहार्यता?

''तुमचे मित्र कोण, विरोधक कोण, शत्रू कोण आणि सहयोगी कोण हे ठरविणे आजच्या जगात अवघड झालेले आहे. कारण, आजकाल कोणीही कोणाचा कायमचा मित्र किंवा कायमचा शत्रू नसतो, कायमस्वरूपी मैत्री किंवा कायमस्वरूपी शत्रुत्व या संकल्पना आता कालबाह्य झाल्या असून त्यांवर विश्वासही ठेवला जात नाही, कारण मैत्री किंवा शत्रुत्व हे केवळ व्यवहारवादाशी निगडित झाले आहे. पटण्याजोगी आणि परवडण्याजोगी देवाणघेवाण शक्य असेल तरच मैत्री शक्य होते. कारण, अनिश्चितता वाढली असून प्रत्येकालाच सुरक्षितता हवी असते. जिथे सुरक्षिततेची हमी असते, तेथे मैत्री अधिक दृढ होते.''

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या मित्र आणि विरोधक यावरून जी काही वादळे सुरू झालेली आहेत, ती पाहता ही विधाने याच राजकारणाशी संबंधित असावीत असाच सर्वसाधारण समज होईल. पण मैत्री आणि विरोधक किंवा शत्रू ही केवळ राजकारणाच्या व्यवहारापुरत्या मर्यादित बाबी राहिलेल्या नाहीत. आंतरराष्ट्रीय संबंधांवरदेखील त्याचाच मोठा प्रभाव दिसतो. जिथे व्यापार, पुरवठा साखळी, तंत्रज्ञानाची उपलब्धता आणि महत्त्वाच्या संसाधनांचा धोरणात्मक वापर केला जातो, तेथे हा व्यवहारवाद दिसतो. आंतरराष्ट्रीय स्तरावरील मैत्री किंवा शत्रुत्वाच्या याच लवचीक संकल्पना महाराष्ट्राच्या राजकारणातही आजकाल दिसू लागल्या आहेत. गेल्या दशकभरात महाराष्ट्रात या घडामोडी अनाकलनीयरीत्या आणि अपरिहार्यपणे घडत गेल्या. संघटित राजकीय पक्ष म्हणून ज्या पक्ष, संघटनांकडे पाहिले जात होते, त्यामध्ये उभी फूट पडली, ज्या नेत्यांकडे पक्षाची ताकद म्हणून पाहिले जात होते, ते नेते पक्षाला रामराम (किंवा जय महाराष्ट्र) करून विरोधकांच्या तंबूत दाखल झाले, तेथे त्यांना मानाचे पान मिळाले आणि ज्या मूळ पक्षातून ते बाहेर पडले, तो पक्ष दुबळा करण्याच्या विरोधकांच्या रणनीतीला बळ मिळाले.

आता काळाचे हे चक्र उलटे फिरविण्याचा आटापिटा महाराष्ट्राच्या राजकारणात सुरू झालेला दिसतो. जे पक्ष तुटले, फुटले, वेगळे झाले आणि एकमेकांचे विरोधक म्हणून समोरासमोर उभे राहिले, त्या पक्षांना पुन्हा एकत्र येण्याची गरज दिसू लागली. सध्या सर्वत्र वापरला जात असलेला विलीनीकरण हा शब्द महाराष्ट्राच्या राजकारणात या गरजेपोटी प्रभावी ठरू लागला असून या शब्दाभोवती राज्याचे राजकारण फिरताना दिसत आहे. राजकारणात अनेक घडामोडी घडत असतात. त्यामागे गरज असते, काही वेळा त्या घडामोडी ही राजकीय अपरिहार्यता असते, तर काही वेळा असे घडणे किंवा घडवून आणणे हा अस्तित्व संपुष्टात येण्याच्या भीतिपोटी निर्माण झालेला निव्वळ नाईलाज असतो. महाराष्ट्रातील सध्याच्या विलीनीकरणाच्या चर्चा आणि त्यासोबत उभे राहिलेले वाद पाहता, हे विलीनीकरण म्हणजे नेमकी कोणाची गरज, कोणती अपरिहार्यता आणि कोणाचा नाईलाज आहे, याचे उत्तर महाराष्ट्राचे राजकारण शोधते आहे. सध्याच्या घडीला ते फारसे अवघड नाही. कारण, विलीनीकरण ही कोणाची गरज आहे, याचे उत्तर त्यासाठी उतावीळ झालेल्यांची वक्तव्ये, कृती आणि विधानांतून पुरेसे स्पष्ट होत आहे. ती कोणती अपरिहार्यता आहे, हे भविष्यातील राजकीय घडामोडींवर अवलंबून आहे. आगामी काळात महाराष्ट्रात होऊ घातलेल्या राज्यसभा निवडणुका, काही जागांसाठी होऊ घातलेल्या विधान परिषदेच्या निवडणुका, अलिकडेच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे निकाल या सर्वांचा एकत्रित आढावा घेतला, तर ती कोणाची अपरिहार्यता आहे, हेही स्पष्ट होऊ शकते आणि विलीनीकरण ही कोणत्या राजकीय पक्षाच्या नाईलाजाची बाब आहे, हे गेल्या काही महिन्यांतील राजकारणातील टाळी देणे, डोळे मारणे वगैरे कृतींवरून स्पष्ट होऊ लागले आहे.

महाराष्ट्रात शालेय शिक्षणात तिसरी भाषा म्हणून हिंदी भाषा सक्तीची करण्याच्या मुद्यावरून उफाळलेल्या भाषावादामुळे शिवसेनेचा उद्धव ठाकरे गट आणि वीस वर्षांपूर्वी शिवसेनेपासून दुरावलेल्या राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी हातमिळवणी करून हिंदीविरोधात राजकीय रण माजविण्यास सुरुवात केली, तेव्हा बाळासाहेब ठाकरे यांच्यावर पराकोटीची निष्ठा असलेल्या जुन्या शिवसैनिकांच्या सुप्त अपेक्षांना नवे धुमारे फुटले. राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व नाकारत २००६ मध्ये बाळासाहेबांच्या शिवसेनेतून बाहेर पडून महाराष्ट्र नवनिर्माण सेना नावाचा 'स्वतःचा' पक्ष स्थापन केला, तेव्हापासून या निष्ठावंतांना ऐक्याची आस लागलेली होती. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकत्र यावे अशी अपेक्षा वेगवेगळ्या वेळी व्यक्त होत होती आणि दरम्यानच्या काळात अनेकांना अनेक राजकीय प्रसंगांतून तशा स्वप्नांचे संकेतही मिळू लागले होते. एखाद्या कौटुंबिक कारणाने राज आणि उद्धव ठाकरे समोरासमोर आले, तरी ऐक्याच्या कल्पनेने ही मने मोहरून जात होती, आता दोघे भाऊ एकत्र येणार, अशा चर्चेला उधाण येत होते. हिंदी सक्तीच्या वादग्रस्त मुद्यावर राज आणि उद्धव ठाकरे एकत्र आले, तेव्हा या स्वप्नपूर्तीचा क्षण जवळ आल्याची या निष्ठावंतांची खात्री पटली आणि ठाकरे गटात उत्सव सुरू झाला. दोघे भाऊ एका मंचावर आले, त्यांनी एकमेकांच्या हातात गुंफलेले हात उंचावून निष्ठावंतांना अभिवादन वगैरे केले, आम्ही एकत्र येत आहोत, असे संकेत देणारी वक्तव्ये उद्धव ठाकरे यांच्यासह त्यांच्या गटातील अनेकांकडून सुरू झाली, 'एकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्यासाठी' असे सांगत उद्धव ठाकरे यांनी ऐक्याची ग्वाही देण्यास सुरुवात केली आणि नगर पंचायती, जिल्हा परिषदांच्या निवडणुकांमध्ये एकत्र आलेल्या दोन्ही पक्षांचे पानिपत झाले आणि महापालिकेच्या निवडणुकांतही पराभवाचीच पुनरावृत्ती झाली.



एकुणातच, दोन्ही पक्षांची महाराष्ट्राच्या राजकारणातून नगण्य ठरावेत एवढी वाईट स्थिती दिसू लागली. भाषाभिमानाचे निमित्त साधून निव्वळ राजकीय अस्तित्व टिकविण्याकरिता एकमेकांच्या आधाराची गरज म्हणून एकत्र येण्याच्या आणाभाका घेणाऱ्या या पक्षांचा राजकीय अस्तित्व टिकविण्याच्या हेतूला महाराष्ट्रात फारसा प्रतिसाद मिळालाच नाही. आता या दोन्ही गटांत दोन्ही बाजूंनी पुन्हा सुरू झालेली खापर फोडण्याची स्पर्धा पाहता, ऐक्याच्या आशेने डोळे लावून बसलेल्या निष्ठावंतांची निराशा होण्याची शक्यता बळावत चालली असून नव्या उमेदीने ऐक्याची स्वप्ने पाहण्याची तयारी सुरू करावी लागणार आहे. पुढच्या काळात ही प्रक्रिया सुरू झालीच, तर त्यामागे गरज, अपरिहार्यता किंवा नाईलाज यापैकीच एखादे कारण असेल आणि ती कोणाची गरज, कोणाची अपरिहार्यता किंवा कोणाचा नाईलाज, याचे स्पष्ट उत्तर मिळालेले असेल.

शिवसेनेत फूट पडून एकनाथ शिंदे यांनी भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतल्यानंतर, पक्षचिन्ह गेले आणि खरी शिवसेना कोणाची असा वाद सुरू झाला. न्यायालयाच्या निर्णयाआधी जनतेच्या न्यायालयातच याचा फैसला होईल, असा विश्वास उद्धव ठाकरे यांना वाटत होता. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांत, जनतेने हा फैसला दिला आहे. राज्यात सर्वत्र उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेपेक्षा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला मिळालेला जनाधार अधिक असल्याचे स्पष्ट झाल्याने, नव्या आघाडीची समीकरणे जुळविणे ही उद्धव ठाकरे यांची गरज, अपरिहार्यता आणि नाईलाजदेखील ठरू पाहत आहे. अर्थात, राज ठाकरे यांची मनसे व उद्धव ठाकरे यांची शिवसेना एकत्र येण्याची पुन्हा थंडावलेली प्रक्रिया सुरू झालीच, तरीही आगामी राज्यसभा किंवा विधान परिषदेच्या निवडणुकांत त्याचा कोणताच फायदा कोणालाही होण्याची शक्यतादेखील नसल्याने, महाविकास आघाडीची मांडलेली गाजराची पुंगी पुन्हा वाजविण्याचा प्रयत्न करणे हाच उद्धव ठाकरे यांच्यापुढील पर्याय असेल. पण सद्य:स्थितीत तेदेखील फारसे सोपे राहिलेले नाही. कारण, विधानसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडीचे अस्तित्वदेखील खिळखिळे झाले आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्रित राजकारण सुरू केल्याचे दिसताच काँग्रेसने त्यांच्यापासून अंतर राखण्यास सुरुवात केली आहे, तर शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसला आपल्याच राजकीय अस्तित्वाचा प्रश्न सतावत आहे. राज्यसभेच्या आगामी निवडणुकीत अस्तित्वाच्या मुद्याची झाकली मूठ उघडी पडण्याआधी अजित पवार गटामध्ये विलीन होण्याचा आटापिटा शरद पवार गटात सुरू झालेला दिसतो. अजित पवार यांच्या बंडानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही पक्षचिन्ह आणि मूळचा पक्ष या मुद्यांवरून सुरू झालेल्या वादात शरद पवार गटाची अवस्थादेखील ठाकरे गटाच्या शिवसेनेसारखीच झाल्याचे स्पष्ट झाले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शरद पवार गटाची सद्दी महाराष्ट्रातून संपत चालल्याचे चित्र स्पष्ट झाले आणि आता राज्यसभेत जाण्याकरिता पुरेसे संख्याबळ जोडण्याचीदेखील क्षमता राहिलेली नसल्याने, अजित पवार गटासोबतच्या विलीनीकरणाची चर्चा जोरात सुरू झाली आहे. हे विलीनीकरण व्हावे हीदेखील शरद पवार गटाची गरज आहे, अपरिहार्यता आहे आणि नाईलाजदेखील आहे, हे त्या गटातील नेत्यांच्या उतावळ्या राजकारणातून स्पष्ट झालेले आहे. अर्थात, विलीनीकरण ही शरद पवार गटांची गरज आहे हे स्पष्ट झाल्यामुळे, अजित पवार यांच्या पश्चात त्यांच्या पक्षातील धुरिणांकडून विलीनीकरणाचे शरद पवार गटाचे डावपेच सहज परतविण्यावरच भर राहील, असे दिसत आहे. कारण, विलीनीकरण झालेच, तर अजित पवार यांच्या गटासमोर अनेक प्रश्न उभे राहणार आहेत. पक्षाचे नेतृत्व कोणाकडे राहणार, पक्षावर नियंत्रण कोणाचे राहणार आणि मुख्य म्हणजे, अजित पवार यांच्यासोबत पक्षाबाहेर पडलेल्यांचे राजकीय महत्त्व किती राहणार हे प्रश्न मागे ठेवून विलीनीकरण शक्य नाही. शिवाय, अजित पवार यांचा गट भाजपसोबत रालोआचा घटक पक्ष म्हणून सत्तेत असल्याने, शरद पवार यांच्या गटास रालोआमध्ये यावे लागेल व त्यास भाजपची मान्यता असेल का, असाही प्रश्न आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात, युती, आघाडीचे अनेक प्रयोग याआधी झाले आहेत. पण राजकीय पक्षांच्या विलीनीकरणाचा मुद्दा बऱ्याच वर्षांनंतर चर्चेत आला आहे. दोन पक्षांचे एकमेकांत विलीनीकरण होण्याची प्रक्रिया महाराष्ट्रात अनेक वर्षांनंतर चर्चेस आली आहे. भारतातील राजकीय पक्षांचे विलीनीकरण ही प्रक्रिया स्वातंत्र्यानंतर लगेचच सुरू झाल्याचा इतिहास आहे. बहुपक्षीय लोकशाहीमध्ये विचारसरणीतील जवळीक सत्तास्थापनेची गरज, काँग्रेसविरोधी आघाडी किंवा प्रादेशिक हितसंबंध ही त्या काळातील राजकीय गरज होती. त्यामुळे, देशातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांच्या आधी, किसान मजदूर पार्टी (आचार्य कृपलानी), सोशालिस्ट पार्टी या दोन पक्षांचे १९५२ मध्ये विलीनीकरण झाले. काँग्रेसविरोधी पर्याय उभा करण्याच्या गरजेतून व संसदीय प्रभाव वाढविण्याच्या उद्देशाने झालेले देशातील हे पहिले विलीनीकरण मानले जाते. १९६०-७० च्या दशकात काँग्रेसमध्ये फूट पडून नव्या काँग्रेस (ओ) आणि काँग्रेस (आर) असे दोन गट तयार झाले व काँग्रेस (आर) ही मुख्य काँग्रेस ठरली. इंदिरा गांधी गट आणि संघटन गट अशा दोन गटांतील नेतृत्वाचा संघर्ष आणि धोरणात्मक मतभेदातून हे दोन गट तयार झाले होते. १९७७ मध्ये भारतीय लोकदल, भारतीय जनसंघ, काँग्रेस (ओ), समाजवादी गट यांचे विलीनीकरण ही देशातील सर्वात मोठी विलीनीकरणाची प्रक्रिया होती. आणिबाणीविरोधातील ऐक्य आणि इंदिरा गांधींच्या नेतृत्वावर आव्हान देण्यासाठी एकत्र आलेल्या या पक्षांनी आपले स्वतंत्र अस्तित्व संपवून जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला आणि देशात सत्तादेखील मिळविली. पण मतभेदांमुळे पुन्हा या पक्षाची शकले होऊ लागली. जनसंघ बाहेर पडला आणि भारतीय जनता पार्टी नावाने या पक्षाने जनसंघाच्या राजकारणाची जुनीच वाट पुन्हा धरली. १९९९ मध्ये सोनिया गांधींच्या विदेशी मुळाच्या मुद्यावर आक्षेप नोंदविल्यानंतर शरद पवार यांना काँग्रेसमधून बाहेर पडावे लागले. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली, पण पुढे पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने सत्तेसाठी सातत्याने काँग्रेसचेच बोट पकडून राजकारण केले. गेल्या दहा वर्षांत पक्षफुटीच्या राजकारणास वेग आला, त्याबरोबरच लहान, प्रादेशिक पक्षांनी मोठ्या पक्षांत विलीनीकरणाचीही वाट धरलेली दिसते. ईशान्य भारतातील काही प्रादेशिक पक्षांचे भारतीय जनता पार्टीत विलीनीकरण झाले. राष्ट्रीय पक्षांसोबत गेल्यानंतर सत्तेत सहभागाची संधी सोपी होते, संसाधनांची कमतरता भरून काढता येते आणि राष्ट्रीय पक्षांच्या पाठबळावर प्रादेशिक प्रभाव वाढविता येतो, ही त्यामागची या पक्षांची गरज होती. त्यामुळे, राजकीय पक्षांचे विभाजन, विलीनीकरण ही भारतीय लोकशाहीची एक वैशिष्ट्यपूर्ण बाजू ठरली आहे. स्वातंत्र्यानंतर या देशात बहुपक्षीय प्रणाली सुरू झाली, पण त्यामध्ये विभाजन आणि विलीनीकरण हे दोन प्रवाह सातत्याने दिसून येतात. विखुरलेले गट सत्तेची गणिते मांडून एकत्र येणे, सत्ता मिळाल्यानंतर मतभेदांमुळे एकमेकांपासून दूर होणे आणि नवी सत्तासमीकरणे दिसू लागताच, गरज, अपरिहार्यता किंवा नाईलाजापोटी एकत्र येणे ही एक सातत्यपूर्ण राजकीय प्रक्रिया ठरली. महाराष्ट्रात आता याच प्रक्रियेची पुनरावृत्ती दिसत आहे. तुमचे मित्र कोण, विरोधक कोण, शत्रू कोण आणि सहयोगी कोण हे ठरविणे आजच्या जगात अवघड झालेले आहे. कारण, आजकाल कोणीही कोणाचा कायमचा मित्र किंवा कायमचा शत्रू नसतो, कायमस्वरूपी मैत्री किंवा कायमस्वरूपी शत्रुत्व या संकल्पना आता कालबाह्य झाल्या असून त्यांवर विश्वासही ठेवला जात नाही, कारण मैत्री किंवा शत्रुत्व हे केवळ व्यवहारवादाशी निगडित झाले आहे. पटण्याजोगी आणि परवडण्याजोगी देवाणघेवाण शक्य असेल तरच मैत्री शक्य होते, हे आंतरराष्ट्रीय संबंधांचे सूत्र महाराष्ट्राच्या राजकारणात तंतोतंत पाहावयास मिळते, ते त्यामुळेच!

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### समर्थ सद्गुरू श्री विष्णुदास स्वामी महाराज जयंती

**(१६ फेब्रुवारीला महाराजांची जयंती आहे, त्यानिमित्त)**

परमपूजनीय समर्थ सद्गुरू श्री विष्णुदास स्वामी महाराज श्रीदत्त अवतारी असून प्रत्यक्ष दत्तस्वरूपच आहेत. त्यांचा जन्म माघ कृष्ण द्वादशीच्या पावन पर्वावर कोकणातील पटवर्धन घराण्यात १६ फेब्रुवारी १९०१ रोजी साखळी या ग्रामी झाला. वैदिक शिक्षण इचलकरंजी येथे झाले. लौकिक अर्थाने शिक्षण नसून त्यांनी 'निसर्ग' हाच आपला गुरू मानून त्याच्या सान्निध्यात खरे पारमार्थिक ज्ञान प्राप्त केले. व्यावहारिक दृष्टीने त्यांना कलकत्ता विद्यापीठाची 'काव्यतीर्थ' पदवी प्राप्त झाली असली तरी संपूर्ण भारत भ्रमण आसेतुहिमाचल करून संपूर्ण आध्यात्मिक ज्ञान निसर्ग सान्निध्यात प्राप्त केले. वयाच्या १२ व्या वर्षी गृहत्याग करून काशी क्षेत्री आले. तेथे अयाचित वृत्तीने तपश्चर्या करीत असलेल्या प. पू. वासुदेवानंद सरस्वतीचे शिष्य प. पू. श्री प्रज्ञानंद सरस्वती यांच्याकडून २२ व्या वर्षी अनुग्रहित झाले. विष्णुदास महाराजांची संन्यास धर्म स्वीकारण्याची प्रबळ इच्छा असून गुरुआज्ञेप्रमाणे त्यांनी समाजकार्यातूनच अध्यात्म धर्माचा प्रचार केला. १९५०-५१ दरम्यान ते मथुरेला आले. त्या ठिकाणी अनेक भक्त तीर्थयात्रेसाठी आले होते. प्लेगची साथ होती. अनेक भाविक गावी निघून गेले. तेथे एका पातोळे नावाच्या आंधळ्याला सर्व मित्र-नातेवाईक एकटे सोडून गेले होते. विष्णुदास महाराजांनी त्याची व्यथा जाणली. मला विदर्भातील तेल्हारा येथील माझ्या खापरखेडा गावी सोडून द्या, अशी विनंती महाराजांना केली. महाराजांनी पायी प्रवास करून त्याला गावी सोडून दिले. त्याला सोडून महाराज जवळ असलेल्या भांबेरी गावी आले. राम मंदिरात मुक्काम केला. मंदिरात कीर्तनसेवा व प्रवचन केले. तेथून कारंजाला आले. नृसिंह सरस्वतीचे दर्शन घेऊन त्यांच्या आज्ञेने भांबेरी परिसरातच आपली कर्मभूमी आहे, याचा निर्णय घेतला. १९५२ पासून भांबेरी-गाडेगाव-तेल्हारा परिसरात राहून तेथेच 'दत्तवाडी'ची स्थापना केली.

परमार्थाची वाटचाल करताना प्रत्येक साधकाला श्रीगुरुद्वारा अनुग्रहित होणे व श्री गुरुसेवा करणे आवश्यक आहे. श्री सखाराम लोखंडकार यांनी आपला संसार त्यागून जन्मभर महाराजांची अविरत निःस्पृहपणे सेवा केली. धर्मभास्कर प. पू. सद्गुरुदास महाराजांकडून शिवकार्याच्या जोडीला पूरक असे प्रचंड 'धर्मकार्य' करवून घेतले.

प. पू. विष्णुदास महाराजांच्या शिकवणीप्रमाणे उपासकांनी चिंता सोडून सतत श्री गुरूंचे चिंतन करावे, तरच सद्गुरू आपली चिंता वाहतात. आपले आर्थिक व्यवहार पण स्वच्छ पारदर्शक असावे. सच्छील कृतीमुळे कीर्ती प्राप्त होते. गुरुकृपेमुळे अहंकाराचे रूपांतर ॐ मध्ये, बुद्धीचे बोधात, चित्ताचे चैतन्यात, लोभाचे वैराग्यात व क्रोधाचे असिम शांतीमध्ये होते. गुरुभक्तीचे पाठबळ असेल तर प्रतिष्ठा, कीर्ती, मान, सन्मान हे त्या व्यक्तीच्या मागे सहज येतात. आपल्या कृपाप्रसादाने प्रगतीची वाटचाल सुकर होईल हाच आशीर्वाद द्यावा.

॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥

**अरुण कडबे**/लाखनी

### कुटुंब प्रबोधन काळाची गरज


कुटुंब प्रबोधन ही भारतीय संस्कृती आणि संयुक्त कुटुंब पद्धतीचे जतन करणारी संकल्पना आहे. पाश्चात्त्य अनुकरणामुळे निर्माण होणाऱ्या स्वकेंद्रित मानसिकतेला दूर सारून, संस्कारक्षम आणि राष्ट्रप्रेमी समाज घडवण्यासाठी कुटुंबात संवाद, प्रेम व आदर वाढवणे हा याचा मुख्य उद्देश आहे. यात भजन, भोजन, भाषा, भूषा, आणि भ्रमण यातून नातेसंबंध दृढ करण्यावर भर दिला जातो.

आजकाल कुटुंब प्रबोधनाची आवश्यकता घराघरात दिसते. ज्या घरात शिक्षण, संस्कार आहेत अशाही कुटुंबात नात्यांमध्ये दुरावा दिसतो. असं का? हा प्रश्न सतत सतावतो. कुटुंब वर वर खूप सशक्त दिसत असलं तरी आतून मात्र पोखरलेलं असतं. हे समाजाच्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने अतिशय घातक आहे. छोट्याशा रुसवे फुगवे आणि अहंची ठिणगी वणवा पेटवू शकते. कुटुंबाला एकत्र बांधून ठेवण्यात वयस्कर व्यक्तींचा खूप मोठा सहभाग असतो. पण आजकाल विभक्त कुटुंबामुळे तो सहभाग अत्यंत अल्प झाला आहे. तडजोड करण्याची सवयच राहिली नाही. दुसऱ्यासाठी काही गोष्टी सोडून द्याव्या लागतात याची जाणीव नाही. आता हा सहभाग कसा वाढवता येईल याचा विचार करावा लागेल. त्यासाठी काही नियम स्वतःहून लावून त्यांचं पालन करण्याचा प्रयत्न करावा लागेल. जसे आठवड्यातून एक दिवस सर्वांनी सोबत जेवायचं किंवा भेटायचं. गप्पागोष्टींमधून काही गैरसमज असतील तर ते दूर करायचे. अनवधानाने काही चुका झाल्या असतील तर त्या दुरुस्त करायच्या, काहीही मानपान न ठेवता! एक पाऊल वीण सांधून ठेवण्याकडे !!

सोशल मीडियाच्या अतिरेकामुळे कमी झालेला कुटुंबातील संवाद पुन्हा सुरू करावा लागेल. स्वदेशी, नागरिक कर्तव्य आणि सामाजिक समरसता यासारखी मूल्ये रुजवावी लागतील. संयुक्त कुटुंबात राहिल्याने सुरक्षेची भावना वाढते आणि संकटाच्या वेळी भावनिक व आर्थिक आधार मिळतो. थोडक्यात, भारतीय संस्कृतीची मूळ तत्त्वे जपून, उद्याचा सक्षम भारतीय नागरिक घडवण्यासाठी कुटुंबाला सक्षम करणे, ही कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीची जवाबदारी आहे.

**वंदना प्रमोद देशपांडे**/९४२२४४४९७७

### शिवाची महान रात्र म्हणजेच महाशिवरात्री



महाशिवरात्री म्हणजे ''शिवाची महान रात्र'' हा भारतीय आध्यात्मिक संस्कृतीमधील एक महत्त्वाचा सोहळा आहे. भारतीय संस्कृतीत एके काळी वर्षभरात ३६५ सण साजरे केले जात असत. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे त्यांना वर्षातील प्रत्येक दिवस साजरा करण्यासाठी काही ना काहीतरी कारण हवे असायचे. हे ३६५ सण विविध कारणांसाठी आणि जीवनातील विविध उद्देश डोळ्यासमोर ठेवून साजरे केले जात होते. विविध ऐतिहासिक घटना, विजय किंवा जीवनातील विशिष्ट परिस्थिती. उदा. पेरणी, लावणी आणि कापणी यासाठी ते साजरे केले जात होते. प्रत्येक परिस्थितीसाठी एक उत्सव होता. परंतु महाशिवरात्रीचे महत्त्व वेगळेच आहे.

प्रत्येक चंद्र महिन्यातील १४ वा दिवस किंवा प्रतिपदेच्या आधीचा दिवस शिवरात्री म्हणून ओळखला जातो. वर्षभरात येणाऱ्या १२ शिवरात्रींपैकी फेब्रुवारी-मार्चमध्ये येणाऱ्या महाशिवरात्रीला सर्वाधिक आध्यात्मिक महत्त्व आहे. या रात्री पृथ्वीच्या उत्तर गोलार्धाची स्थिती अशाप्रकारे असते की मानवामध्ये नैसर्गिकरीत्या ऊर्जेचे एक उधाण निर्माण होते. हा असा दिवस असतो जेव्हा निसर्ग एखाद्या व्यक्तीला त्याच्या आध्यात्मिक शिखराकडे ढकलत असतो. याचाच वापर करून घेण्यासाठी या संस्कृतीमध्ये आपण एक विशिष्ट सण स्थापित केला आहे, जो रात्रभर चालतो. या नैसर्गिक ऊर्जेची वाढ होऊ देण्यासाठी, रात्रभर चालणाऱ्या या उत्सवाचा एक मूलभूत उद्देश म्हणजे आपण रात्रभर आपल्या पाठीचा कणा ताठ ठेवून संपूर्ण रात्र न झोपता जागे राहणे. जे लोक आध्यात्मिक मार्गावर आहेत, त्यांच्यासाठी महाशिवरात्र अतिशय महत्त्वाची आहे. कौटुंबिक व्यक्ती तसेच जगातील महत्त्वाकांक्षी लोकांसाठी देखील ती अतिशय महत्त्वाची आहे. कुटुंबात रममाण होणाऱ्या व्यक्ती हा दिवस शिवाच्या विवाहाचा उत्सव म्हणून साजरा करतात. जे लोक अतिशय महत्त्वाकांक्षी आहेत ते हा दिवस शिवाने त्याच्या सर्व शत्रूंवर मात करून विजय मिळविल्याचा दिवस म्हणून साजरा करतात. पण संन्यासी अर्थात योगी लोकांसाठी शिव कैलास पर्वतासोबत एकरूप झाल्याचा दिवस आहे. तो पर्वतासारखाच पूर्णपणे अचल म्हणजेच स्थिर झाला. यौगिक परंपरेत शिवाला देव म्हणून पूजले जात नाही तर त्यांना आदिगुरु म्हणजे ज्यांच्यापासून योगशास्त्राची उत्पत्ती झाली ते प्रथम गुरू असे मानले जाते. अनेक सहस्र वर्षे ध्यानावस्थेत राहिल्यानंतर एक दिवस ते पूर्णपणे निश्चल म्हणजे स्थिर बनले, तो दिवस म्हणजे महाशिवरात्री. त्यांच्या सर्व हालचाली थांबल्या आणि तो पूर्णपणे अचल झाला, म्हणून संन्यासी लोक महाशिवरात्रीला निश्चलतेची अर्थात स्थैर्याची रात्र मानतात.

महाशिवरात्रीचे आध्यात्मिक महत्त्व पौराणिक कथांव्यतिरिक्त योग परंपरेमध्ये या दिवसाला आणि रात्रीला इतके महत्त्व दिले जाते. महाशिवरात्री ही एक संधी आणि शक्यता आहे. ती विशाल शून्यता अनुभवण्याची जी प्रत्येक मानवाच्या आत आहे, जी सर्व सृष्टीचा स्रोत आहे. एकीकडे शिव संहारक म्हणून ओळखला जातो. तर दुसरीकडे तो सर्वांत कृपाळू म्हणून ओळखला जातो. तो सर्वांत श्रेष्ठ दाता म्हणूनही ओळखला जातो. योग पुराणात शिवाच्या कृपाळू स्वभावाबद्दल अनेक कथा आहेत. त्याचा कृपाळूपणा व्यक्त करण्याची पद्धत अद्भुत आणि त्याचवेळी विचित्र आहे. त्यामुळे महाशिवरात्र ही कृपा ग्रहण करण्यासाठी एक खास रात्र आहे. ही रात्र आपल्यासाठी फक्त जागरणाची रात्र नाही, तर जागृतीची रात्र होवो हीच सदिच्छा..!

**सुनील शिरपुरे**/७०५७१८५४७९

### स्थिर मती रमती नित्य प्रार्थती

सगुण-निर्गुण स्वरूपात ईश्वराशी अनुसंधान साधण्यासाठी 'प्रार्थना' हे सर्वोत्कृष्ट माध्यम होय. प्रार्थना म्हणजे नम्र निवेदन. या निवेदनातून भाविक व्यक्तिगत, कौटुंबिक, सामूहिक हित व्हावे अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. सर्व धर्म, पंथ, समुदायामध्ये प्रार्थनेला अनन्यसाधारण महत्त्व असून फक्त सनातन धर्मात सगुण रूपाची प्रार्थना केली जाते. गुण-कर्मानुसार देवता मूर्तीची संकल्पना साकार होऊन त्या देवतेशी तादात्म्य पावण्यासाठी प्रार्थना फलद्रुप होते. प्रार्थनेत ईश्वराच्या सगुण रूपाचे वर्णन, गुणगौरव व स्तुतीपर रचना समर्पित भावनेने व्यक्त होतात. उपासना फलद्रुप होण्यासाठी चित्त, बुद्धी स्थिर असावी लागते. त्यासाठी नित्य सराव, बैठक, वेळ दिल्याने मनाची चंचलता शनै-शनै कमी होत जाते आणि उपासक त्यात रमतो आणि सात्त्विक आनंद प्राप्त करून घेत असतो. उपासना ही व्यक्तिगत आणि सामूहिकसुद्धा असते. उपासनेने मानसिक बळ प्राप्त होऊन एकटेपणाची भावना नष्ट होते. मानसिक अस्वास्थ्य, भ्रम, नैराश्य आणि चंचलता कमी होऊन सकारात्मक भावना वृद्धिंगत होते. भौतिक सुखाची आसक्ती कमी होते. मती स्थिर होते, आचार-विचारात प्रगल्भता येऊन जीवन व्यापन सुखकर होते. प्रापंचिक जीवनात लालसा, प्रलोभन, कुसंगतीमुळे दुष्कर्म घडले असतील आणि त्यांचे दुष्परिणाम जाणवत असतील तर पश्चात्ताप व्यक्त करून समर्पित भावनेने प्रार्थना केल्यास, ईश्वरास नम्र निवेदन केल्यास त्याचे गांभीर्य कमी होण्यास मदत मिळते.

सनातन पद्धतीने सगुण-निर्गुण म्हणजे द्वैत-अद्वैत संकल्पनेतून मोक्ष प्राप्त करून घेण्यासाठी ज्ञान मार्ग, योग मार्ग, कर्म मार्ग आणि भक्तिमार्गाचा उपदेश केला आहे. यात संतांनी प्रापंचिक व्यक्तीस उपासनेसाठी भक्तिमार्गात सहज उपलब्ध असे नामस्मरण करून ईश्वराशी संधान साधण्यासाठी प्रार्थनेचा अवलंब करण्याचा उपदेश केला आहे. ईश्वर हा भाव ग्राह्य असल्याने निष्काम व अहंकाररहित समर्पित वृत्तीचे निवेदन स्वीकार करून क्लेशहरण होते अशी भक्तांची धारणा असून याची अनेकांना अनुभूती पण येते.

आपल्या सनातन संस्कृतीमध्ये
सर्वे भवंतु सुखीनः सर्वे संतु निरामयः
अशी वैश्विक प्रार्थना केली आहे.

या उदात्त भावनेने केलेली प्रार्थना '' हे विश्वचि माझे घर''ची धारणा दृढ करते. आपल्या संस्कृतीत प्रार्थनेचे अनेक प्रकार आहेत. स्तवन, आरती, गायन, मंत्रोच्चार इत्यादी माध्यमातून सर्व शक्तिमान ईश्वरास शरण जाऊन दुःख, क्लेश, कष्ट, त्रास आणि भोग यांचे निरसन व्हावे यासाठी प्रेम रस, कारुण्य रस आणि आर्तता असेल प्रार्थना लवकर फलद्रुप होऊन मानसिक समाधान प्राप्त होते असा भाविकांचा अनुभव आहे.

**संजय पाठक**/९४२२१४७६७७

### ग्रामीण भागात भाजपचा विस्तार, काँग्रेसची पीछेहाट

राज्यातील जिल्हा परिषदांच्या आणि पंचायत समितीच्या निकालांनी हे सिद्ध केले आहे की, भाजपने आता काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात म्हणजेच ग्रामीण भागात आपली पाळेमुळे घट्ट रोवली आहेत. एकेकाळी जनसंघ ही भाजपची ओळख होती, ज्याला उच्चवर्णीयांचा पक्ष म्हणून तसेच शहरी पक्ष म्हणून म्हटले जायचे. मात्र, वसंतराव भागवत यांनी दूरदृष्टीने माधव (माळी, धनगर, वंजारी) हे समीकरण मांडले. गोपीनाथ मुंडे, पांडुरंग फुंडकर आणि ना. स. फरांदे, अण्णा डांगे यांसारख्या बहुजन नेत्यांना पक्षाच्या अग्रभागी आणल्यामुळे ओबीसी समाज मोठ्या प्रमाणावर पक्षाशी जोडला गेला. यामुळे पक्षाचा चेहरा बदलला आणि बहुजन समाजाला आपला वाटणारा पक्ष अशी भाजपची प्रतिमा तयार झाली.

उत्तमराव पाटील, रामभाऊ म्हाळगी, जगन्नाथ पाटील, अर्जुनराव वानखेडे, श्यामराव कापगते, मोतीराम लहाने यांसारख्या नेत्यांनी संसदीय राजकारणात आदर्शाची पायरी निर्माण केली. काँग्रेस हा पक्ष देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेला पक्ष होता, पण अंतर्गत गटबाजी आणि बदलत्या मतदारांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरल्याने हा पक्ष आता आकुंचन पावत आहे. याउलट, भाजपने हिंदुत्वाच्या मुद्याला विकासाची जोड दिली. ग्रामीण भागात रस्ते, पाणी आणि वीज यासारख्या मूलभूत प्रश्नांवर भर दिल्याने शेतकरी आणि ग्रामीण तरुण वर्गाचा कल भाजपच्या बाजूने झुकला. आजचा भाजप हा केवळ घोषणा देणारा पक्ष नसून तो निवडणूक जिंकणारे तंत्र बनला आहे. लक्ष्मणराव मानकर, मोतीराम लहाने यासारख्या नेत्यांनी ग्रामीण भागात कष्ट उपसले, तर आताच्या पिढीतील नेत्यांनी सूक्ष्म नियोजन करून प्रत्येक बुथ स्तरावर पक्षाला मजबूत केले. भाजपने आपल्या मूळ चौकटीबाहेर पडून स्वीकारलेली सर्वसमावेशकता हेच त्यांच्या यशाचे गमक आहे. केवळ शहरांपुरता मर्यादित असलेला हा पक्ष आज खेड्यापाड्यात पोहोचला असून, तो काँग्रेसला पर्याय न ठरता आज मुख्य प्रवाहातील सर्वांत मोठा पक्ष बनला आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

### 'ती'चा दिवस

८ मार्च जवळ आला की काय काय करायचं? कसा साजरा करायचा आपण वुमेन्स डे. केक पासून तर पिकनिकपर्यंत सगळे प्लॅन्स ठरले असतात साधारण शहरी महिलांचे. काही जणी तर या दिवसासाठी ड्रेस कोड पण ठरवून नवीन कपड्यांची खरेदी करतात. त्या निमित्ताने सगळे एकत्र भेटून आनंद साजरा करतात. कुठे भरगच्च कार्यक्रम ठरले असतात. शाळा, महाविद्यालये किंवा सामाजिक संस्थांमध्ये कार्यक्रम घ्यायचा म्हणजे कुणाला प्रमुख पाहुणे म्हणून बोलवायचे याची चर्चा होते. अनेक सामाजिक क्षेत्रातील महिलांचे कार्यक्रम आधीच ठरलेले असतात. एखादी प्रेरणादायी महिला आपल्या कर्तृत्वाने प्रेरित करून आपला दिवस खास करते. कामावर जाणाऱ्या महिला ठरवून त्या दिवशी खास वेष परिधान करतात. एकंदर सगळीकडे कौतुक सोहळा असतो.



परंतु त्याच बरोबर शेतात काम करणाऱ्या महिला, भाजी विकणाऱ्या, मजुरी करणाऱ्या, खडी फोडणाऱ्या महिलांना हा दिवस माहिती आहे का? बरं आपल्या घरी काम करणाऱ्या मदतनीसला आपल्यामुळे माहीत असतो पण तिनेच या दिवशी सुट्टी घेतली तर आपले वेळापत्रक बिघडणार. असो.. या अगदीच सामान्य गोष्टी. परंतु एकच दिवस का? 'ती'च्याशिवाय जगाचा व्यवहार चालू शकत नाही. त्यामुळे ती आणि त्याचे दिवस समांतर आहेत. काही गोष्टी किंवा काही प्रसंग वर्षातून एकदा आठवण म्हणून करण्याजोग्या असतात म्हणून या दिवसाचे औचित्य असते आणि ते आपण पुरेपूर पाळावे. तो आपला दिवस म्हणून आपल्या परीने प्रत्येकाने साजरा करावा.

परंतु आज आपल्याकडे एकटी स्त्री सुरक्षित आहे का? गेल्या काही दिवसांपूर्वीची पुण्याची घटना बघता तसेच दोन वर्षांपासून अनेक कल्पनेच्या पलीकडील स्त्री वरील अत्याचाराच्या घटना ऐकल्या वाचल्या की आपण प्रगती करतो आहोत की अधोगतीला जातो आहोत हा प्रश्न उपस्थित राहतो. एखाद्या संगीताच्या मैफिलीत एखादे गीत हृदयाला इतके भिडून जाते की सर्व मैफिलीवर या गीताने राज्य गाजविले असे वाटते. असे असले तरी उरलेली मैफिल नको होती का? त्या गाण्याला वाद्याची साथ करणारे जे होते ते नको होते का? सर्वांचा मिळून एक परिणाम असतो. वस्तुतः मैफिलच चांगली असावी लागते.

त्यातल्या एकाच गाण्यासाठी कुणी आले नसते. तसे या संपूर्ण सृष्टीत स्त्रीत्व ओतप्रोत भरलेले आहे. स्त्रीत्वाचे प्रतिनिधित्व करणारी स्त्री, तिचे ३६५ दिवस असायला हवेत. तिची प्रतिष्ठा, तिचा मान अपरंपार आहे. तसेच ती संपूर्ण विश्वाचा प्राण आहे. भारतीय परंपरेच्या संकल्पनेत द्वैत नसतेच. त्यामुळे अनादी काळात स्त्री आणि पुरुष यांना समान दर्जा दिलेला आहे. वीज असली पण दिवा लावला नाही तर विजेचे अस्तित्व कळणार नाही. तसेच दिवा असला पण विजेचे कनेक्शन नसेल तर दिव्याचे अस्तित्व शून्य आहे. त्यामुळे एक दिवस विजेचा आणि एक दिवस दिव्याचा असे होत नाही. वीज आणि दिवा यातून पडणाऱ्या प्रकाशाचा एक दिवस असं आपण म्हणूया. रोज स्त्रीला मान द्यावा असे जेव्हा म्हटले जाते याचा अर्थ सर्वच बाबतीत ती अग्रणी आहे. तिच्यामुळेच तयार होते घर. तिच्यामुळेच आवश्यकता असते पुरुषाला बलाढ्य होण्याची.

भारतीय परंपरेचा थोडा अभ्यास केला तर जागतिक महिला दिनाचे महत्त्व अधिक कळून येईल आणि हा दिवसच नव्हे तर सगळेच दिवस आनंदाने सार्थक केल्याचे समाधान मिळेल. आजच्या दिवशी स्त्रियांना मनाने वागविणे, भेटवस्तू देणे हा क्षणिक आनंद निर्माण करणारा सोहळा असतो तोही करावाच. पुरुषाने मनापासून स्त्रीचा अधिकार स्वीकारला, तिचे महत्त्व ओळखले आणि त्याप्रमाणे आचरणात बदल केला तर जागतिक महिला दिनाचे खरे सार्थक होईल.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



**श्रीक्षेत्र रामतीर्थ मठ , परमपूज्य महायोगी दादा महाराज खडकीकर रामतीर्थ मठ , दर्शन महादेव मंदिरात गेवराई मतदार संघाचे आमदार श्री विजयसिंह पंडित यांच्या हस्ते पूजा व आरती संपन्न झाली, यावेळी विद्या गुरु महाराज खडकीकर, यांनी शाल श्रीफळ प्रसाद दिला , यावेळी परिसरातील सर्व भावी भक्तांना फराळाचे वाटप करण्यात आले मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते परिसरातील महादेव भक्तांनी प्रसादाचे वाटप व्यवस्थित केले.**

## संस्कार विद्यालयातील विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेटीच्या लुटला प्रवासाचा आनंद



बीड (प्रतिनिधी) येथील संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेटीच्या निमित्ताने बीड ते राजुरी रेल्वेत बसण्याचा मनमुराद आनंद लुटला. यावेळी विद्यार्थ्यांचा उत्साह, आनंद मनाला प्रसन्न करून जाणारा होता. या प्रवासादरम्यान मंगलमूर्ती मोरया, नारायणगड भगवान की जय, शालेय कविता, विविध गीत गायनातून बीडची रल्वे भक्तिमय झाली होती. चिमुकल्यांच्या आवाजाने दणाणून गेली होती .दिनांक १३/ २ /२०२६ रोजी ही क्षेत्रभेट संपन्न झाली .या क्षेत्रभेटीमध्ये विद्यार्थ्यांनी गणपतीचे दर्शन करून नवगण राजुरीचे धार्मिक महत्त्व समजावून घेतले. नारायणगडावर पांडुरंगाचे दर्शन घेऊन अभंगावर नृत्य करुन स्नेहभोजनाचा आनंद घेतला. ही सहल यशस्वी होण्यासाठी संस्कार प्रबोधिनीचे सर्व संचालक मंडळ, माननीय मुख्याध्यापिका शोभाताई कुलकर्णी, माननीय विभाग प्रमुख श्रीमती विद्याताई पारगांवकर यांचे मार्गदर्शन लाभले. सहल प्रमुख श्रीयुत जी. आर. कुलकर्णी व सर्व सहकारी शिक्षक वृंदांनी विद्यार्थ्यांची सर्वतोपरी काळजी घेऊन सहल यशस्वीरित्या संपन्न केली.

## बीडचा सार्वजनिक जयभीम महोत्सव डीजेमुक्त साजरा होणार



बीड/प्रतिनिधी : संविधान निर्माते महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती बहुतांश देशात साजरी होते. त्या अनुषंगाने राज्यात बीडच्या सार्वजनिक जयभीम महोत्सवाने देखील स्वबळावरची एक आदर्श जयंती म्हणून लौकिक मिळविला आहे. तसेच यंदाचा जयभीम महोत्सव हा डीजेमुक्त साजरा होणार असून पहिल्याच बैठकीत तब्बल 7 लाख रुपये वर्गणी समाजातून जमा झाली आहे. विशेषतः म्हणजे यावर्षीचा हा जयभीम महोत्सव युवकांच्या हाती देण्यात आला आहे.त्यामुळे याहीवर्षी आगळीवेगळी जयंती साजरी करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती आत्तापासूनच जय्यत तयारीला लागली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंती निमित्ताने बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे शनिवार (ता.14) फेब्रुवारी रोजी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या अध्यक्षतेखाली महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत 2025 च्या जयंतीचा जमा-खर्च आणि शिल्लक-बाकी सादर करण्यात आली. तसेच सर्वानुमते डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती 2026 ची नियोजन समिती घोषित करण्यात आली. त्यामध्ये मनोज वाघमारे, सुमेध जोगदंड, विजय समुद्रे, महादेव इनकर, प्राचार्य पंडित मुने, उद्धव बनसोडे, ॲड.राजेश शिंदे, स्वप्नील चोपडे, संतोष गायकवाड, दयानंद सरपते,ॲड.तेजस वडमारे,ॲड. नितिन वाघमारे, सोनू सरवदे, प्रा.रोहित डोंगरे, संजय जाधव, प्राचार्य प्रदीप गाडे, प्रा.प्रेमानंद सिरसट, विनोद कांबळे, सुरेश साबळे, कल्याण भंडारे, अशोक ठोकळ, प्रा.अशोक गायकवाड, शरद मगर, यांचा समावेश आहे.

## बीड नगरपालिकेच्या स्थायी समितीची पहिली बैठक पडली पार

बीड, १४ फेब्रुवारी : बीड नगर परिषदेच्या स्थायी समितीची पहिली बैठक पार पडली. या बैठकीत शहराच्या सर्वांगीण विकासासंबंधी विविध महत्त्वाचे मुद्दे चर्चेला आले. जिल्हा वार्षिक योजना २०२६-२०२७अंतर्गत शहरातील विविध भागांमध्ये रस्ते, नाल्या, बांधकाम, स्वच्छता, आरोग्य, पाणी आदी मूलभूत विषयांवर चर्चा झाली. स्थायी समिती देण्यात आली. अध्यक्ष प्रेमलता पारवे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये २०२६-२७ या वित्तीय वर्षाच्या लिकेज दुरुस्तीकरिता ई-निविदा करणे, टँकरद्वारे पाणी पुरवठा, संभाव्य पाणीटंचाईबाबत विशेष उपाययोजना. नगररचना विभाग : गुंठेवारी विकास अधिनियमांतर्गत प्रस्ताव स्वीकारणे या संदर्भात चर्चा झाली. शहरातील आठवडी बाजार, भाजी मंडई व इतर ठिकाणचे वसुलीचे काम ई-निविदा प्रसिद्ध करून टेंडर पद्धतीने देणे. २०२६ या वर्षातील रमजान ईद इतर सणानिमित्त बशीरगंज, मैदानावर मीनाबाजार भरवण्याबाबत विचार करण्यात आला.अर्थसंकल्पास सर्वानुमते मान्यता देण्यात आली या वेळी उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, स्थायी समिती सदस्य अमर नाईकवाडे, स्वच्छता सभापती शेख निजाम, सभापती आरती बनसोडे, सभापती संजय उडाण, सभापती बाळासाहेब गुंजाळ, सभापती सीमा परवीन यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज चौकासाठी २ कोटींचा निधी

**तभा वृत्तसेवा**

केज : दि.१३ : केज शहराच्या मध्यवर्ती असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडून २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात येत आहे. त्याचा आदेशही लवकरच मिळेल. यापुढे केज विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेला अधिक बळ दिले जाणार आहे, असे प्रतिपादन सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केले आहे.



केजमध्ये शिवसेना उपनेता तथा माजी आमदार संगीता ठोंबरे यांच्या पुढाकारातून शिवसेना कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा व पक्ष प्रवेश सोहळा उत्साहात पडला. यावेळी श्री.शिरसाट हे बोलत होते. व्यासपीठावर संगीता ठोंबरे यांच्यासह शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख मनोज शिंदे, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, चंद्रकांत नवले, लोकनेते गोपीनाथ मुंडे सहकारी सूतगिरणीचे चेअरमन विजय प्रकाश ठोंबरे, महिला जिल्हाध्यक्ष सांगिता चव्हाण, विधानसभा अध्यक्ष दादासाहेब ससाणे यांच्यासह जिल्हा व तालुका पदाधिकारी, मराठवाडा विभागातील नेते आणि मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी संगीता ठोंबरे यांनी केजच्या महत्त्वाच्या विकास प्रश्नांकडे लक्ष वेधले. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या केज शहरातील पुतळ्याची सन्मानपूर्वक पुनर्स्थापना, स्मारक परिसराचे सुशोभीकरण आणि चौकाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

## जिल्ह्यातील रक्कम भरणा करणाऱ्या शेतकरी ग्राहकांना सौर ऊर्जा तात्काळ उपलब्ध करून द्या :- अनिल बोर्डे

**तभा वृत्तसेवा**



गेवराई ( प्रतिनिधी) बीड जिल्ह्यातील शेतकरी ग्राहकाना मागेल त्याला सौर ऊर्जा योजनेचा लाभ मिळावा यासाठी ग्राहक पंचायतने महाराष्ट्र यांनी यापूर्वी वारंवार शासनाकडे मागणी केलेली आहे .त्यां संबंधिचा लाभ बीड जिल्ह्यातील बहुसंख्य शेतकरी ग्राहकांना झालेला आहे. उर्वरित जिल्ह्यातील शेतकरी ग्राहकांनी सौर ऊर्जा योजनेचा लाभ मिळावा यासाठी शेतकरी ग्राहकांनी एक ते दीड वर्ष पूर्वी महावितरण कंपनी कडे रकमेचा रकमेचा भरणा केलेला आहे. परंतु अद्याप पर्यंत कंपनीकडून सौर ऊर्जा योजनेचा लाभ मिळत नाही. त्यामुळे शेतकरी ग्राहकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी रक्कम भरणाऱ्या सर्व शेतकरी ग्राहकांना सौर ऊर्जा योजना लाभ मिळण्यासाठी मा. श्री देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन, मा. मुख्य अभियंता महावितरण लातूर, मा. जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे मागणी केली आहे.

बीड जिल्ह्यातील बहुतांश शेतकरी ग्राहक शेतीवर अवलंबून असून इतर काम धंदे नसल्यामुळे शेतकरी वर्ग आर्थिक अडचणीत आहे. या भागात मागास म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात दळणवळणाची साधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध नाहीत. तसेच मागास भाग असल्यामुळे उद्योग धंदे देखील नाहीत. शेती शिवाय पर्याय नसल्यामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अग्रक्रमाने सौर ऊर्जा लाभ मिळणे आवश्यक आहे. ज्या शेतकरी ग्राहकांनी या योजनेसाठी आजपर्यंत पैशाचा भरणा करणाऱ्या सर्व शेतकरी ग्राहकांना सौर ऊर्जा तात्काळ उपलब्ध करून द्यावी अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत चे महाराष्ट्राचे उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी संबंधिताकडे केली आहे.

## बीड शहरात जल्लोषात संत सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

बीड, ता. १५ :- जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये संत सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. सर्वत्र धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून समाजबांधवांनी आपल्या श्रद्धेची प्रचिती दिली.

शहरातील संत श्री सेवालाल महाराज चौक येथे रविवारी (ता.१५) सकाळी ९ वाजता मुख्य कार्यक्रम पार पडला. शहरासह तालुक्यातील बंजारा समाजबांधव मोठ्या संख्येने एकत्रित आले होते. पारंपरिक बंजारा पद्धतीने 'भोग' अर्पण करून संतांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात आणि जयघोषात परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी संत सेवालाल महाराज यांच्या जीवनकार्यावर प्रभावी भाषणे केली. समाजजागृती, सदाचार, एकता आणि आध्यात्मिकतेचा संदेश त्यांनी आपल्या विचारांतून अधोरेखित केला. काही विद्यार्थ्यांनी बंजारा पारंपरिक वेशभूषा परिधान करून रंगतदार बंजारा गीत सादर केले. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमही राबविण्यात आले.

## ना.पंकजाताई मुंडे यांनी घेतले प्रभू वैद्यनाथाचे दर्शन

### महाशिवरात्री निमित्त परळीत शिवभक्तांची मांदियाळी

**तभा वृत्तसेवा**

परळी वैजनाथ दि. १५..

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेतले.

प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी आज महाशिवरात्री निमित्त राज्याच्या तसेच देशाच्या कानाकोपर्यातून लाखो भाविकांनी मोठी गर्दी केली होती. सकाळी पंकजाताई मुंडे यांनी वैद्यनाथ मंदिरात जाऊन ज्योर्तिलिंगाचे दर्शन घेतले. वैद्यनाथ देवल कमिटीचे अध्यक्ष व तहसीलदार व्यंकटेश मुंडे, विश्वस्त राजेश देशमुख यांनी त्यांचे स्वागत केले.



सेल्फी घेण्यासाठी महिला भाविक युवक, युवतींची झुंबड

पंकजाताई मुंडे दर्शन घेऊन बाहेर आल्यानंतर मंदिराच्या प्रांगणात जमा झालेल्या महिला, युवक, युवती व सर्व सामान्य नागरिकांनी त्यांचेसोबत सेल्फी घेण्यासाठी त्यांना एकच गराडा घातला. सेल्फीसाठी प्रत्येकांची झुंबड उडाली होती, पंकजाताईंनी देखील यासाठी सर्वांना आवर्जून मनसोक्त वेळ देत सर्वांची इच्छा पूर्ण केली तसेच भाविकांना महाशिवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या.

भाविकांना खिचडीचे वाटप

भाविकांना उपवासाची खिचडी मोफत वाटप करण्यासाठी परळी नगरपरिषद तसेच भाजपचे युवा नेते निळकंठ चाटे यांनी उभारलेल्या स्टॉलला ना. पंकजाताई मुंडे यांनी भेट दिली, त्यांच्या हस्ते दर्शनासाठी आलेल्या भाविकांना खिचडीचे वाटप करण्यात आले.

## ॲड. गोविंद शिराळे पाटील यांनी केला पंकजाताई मुंडे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

बीड प्रतिनिधी.

परळी येथे जाऊन बीड येथील नगरसेवक ॲड.गोविंद नवनाथ शिराळे पाटील यांनी राज्याच्या पर्यावरण पशुसंवर्धन जिल्ह्याच्या माजी पालकमंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांचा नगरसेवक म्हणून संधी दिल्याबद्दल हृदयपूर्वक सत्कार परळी येथे जाऊन केला व नंतर पंकजाताई यांनी नगरसेवक ॲड.गोविंद शिराळे पाटील यांना सांगितले की आपल्यावर खूप मोठी बीड शहराची लोकांचे काम करण्याची जबाबदारी आहे ती जबाबदारी आपण लोकांचे सर्वसामान्यांचे प्रश्न सोडून त्यांना बीड नगरपालिकेच्या माध्यमातून सर्व सामान्य लोकांना न्याय देऊन आपल्यावर टाकलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडा अशा सूचना देखील यावेळी नामदार श्रीमती पंकजाताई मुंडे यांनी केल्या या व पुढील उत्कृष्ट त्यांच्या हातून होणाऱ्या बीड शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या बीड नगरपालिकेच्या माध्यमातून होणाऱ्या कार्याच्या सेवेसाठी श्रीमती नामदार पंकजाताई मुंडे यांनी देखील नगरसेवक ॲड. गोविंद शिराळे पाटील यांना शुभेच्छा दिल्या .



यावेळी येथे उपस्थित असलेले भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा लोकशाही पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील तसेच उपस्थित असलेल्या बीड जिल्हा नगर परिषदेच्या माजी अध्यक्षा श्रीमती मीराताई गाधंले तसेच लोकशाही पत्रकार संघाचे सर्वेसर्वा संस्थापक बीबी वैद्य साहेब तसेच पेठ बीड भागातील माजी नगरसेवक बाबुराव पडळकर तसेच लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर सह मान्यवर उपस्थित होते .

## पालकांनी बदलत्या परिस्थितीचा स्वीकार केला पाहिजे- अंकुशरावजी इंगळे



**तभा वृत्तसेवा**

केज प्रतिनिधी: दि. १४ फेब्रुवारी- जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर [ माध्यमिक विभाग ] या शाळेमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ, शिक्षक पालक मेळावा तसेच करियर गाईडन्स हा तिहेरी कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अंकुशरावजी इंगळे अध्यक्ष, जीवन विकास शिक्षण मंडळ तथा सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती केज, तर प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगर येथील सच्चिदानंद घोणसे अध्यक्ष, श्री. साई शैक्षणिक व बहुउद्देशीय संस्था अहिल्यानगर तथा संचालक, घोणसे मॅथ अकॅडमी अहिल्यानगर हे उपस्थित होते. इतर उपस्थित मान्यवरांमध्ये संस्थेचे सचिव तथा मार्गदर्शक जी. बी. गदळे, संस्थेचे संचालक विलास जोशी, संस्थेचे सहसचिव तथा स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल केजचे मु. अ. उपेंद्र कोकीळ, स्वयंअर्थ शाळेचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नारायणराव अंधारे, शालेय व्यवस्थापन समिती मा. वि. च्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, वसंत शितोळे आदी उपस्थित होते.

# तळतळाट घेऊन संपत्ती कमवू नका- ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख

**तभा वृत्तसेवा**

नवगण राजुरी दि. १५(प्रतिनिधी):- गैरमार्गाचा पैसा, पापाचा पैसा, व्याजाचा पैसा, कमी कष्टाचा पैसा खानदान संपविल्याशिवाय राहत नाही. कष्ट करून संपत्ती कमवा, तळतळाट घेऊन संपत्ती कमवू नका. ज्यांचे मित्र खास त्यांचा संसार चांगला, ज्याचे मित्र नालायक त्याचा संसार संपला. घरात भांड्याला भांड लागत असतं भांडण- तंटे होतच असतात पण घरातल्या गोपनीय गोष्टी इतरांना सांगू नका असे प्रतिपादन समाज प्रबोधनकार ह. भ. प. निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांनी केले.



श्री क्षेत्र संस्थान लिंबारुई येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात शनिवारी कीर्तन प्रसंगी ह. भ. प. निवृत्ती महाराज देशमुख यांनी संत ज्ञानेश्वराच्या हरिपाठातील अभंग कीर्तनासाठी घेतला. हरिकीर्तन सांगतांना पुढे ते म्हणाले की, वारकरी सांप्रदायाचे मूळ भगवान शंकर आहे. २० टक्के लोक पुण्यवान आहेत तर ८० टक्के लोक पाप करतात २० टक्के पुण्यवान लोकांवर ८० टक्के लोकांचं जीवन आहे. परमार्थ हा साधनाचा विषय आहे तो लोकांना दाखवायचा नसतो प्रेम म्हणजे पैसा आणि पैसा म्हणजे प्रेम, माणसं माणसावर प्रेम करीत नाहीत तर पैशावर प्रेम करतात. पैसा, मान, माझ्यापुढे कोणी गेला नाही पाहिजे या तीन गोष्टीला महत्त्व आहे लोक वरून देखणे आहेत पण आतून भंगार आहेत बोलतात एक आणि करतात एक.आजच्या युगात रक्ताचे नाते राहिले नाही मी ३१ वर्षा पूर्वी सांगितले होते. मजूर गाडीवर येईल आला. नोकर मालकाला व्याजाने पैसे देईल देत आहे, शेताच्या बांधावर गाडी उभा करण्यासाठी जागा ठेवावा लागेल ठेवली. पाच वर्षांनी जमीन शिल्लक राहणार नाही वाईट दिवस येणार आहेत हायवेच्या कडेच्या जमिनी विकल्या तेथे धाबे टाकल्यानंतर त्या धाब्यावर जमीन मालकाला वेटर म्हणून काम करण्याची वेळ आली. पाच वर्षांनी सामान्य माणसाचं जगणं अवघड होणार आहे. आताची तरुण मुले व्यसनाधीन झाले आहेत.



व्यसन करू नका, व्यसनमुक्त जीवन जगा असा संदेश देऊन दारू, जुगार, मोबाईलचा गैरवापरा- मुळे मुले बिघडले आहेत. त्यामुळे बापावर नाही तर पोरावर कर्ज झाले आहे. आम्ही खरे बोलतो म्हणून आमचा लोकांना राग येतो.

८० टक्के बापाला संपत्ती कमविता आली पण त्यांना पोरं चांगली बनविता आले नाही, मुलांना चांगले बनवा ते वाया जाणार नाहीत आपली गुप्त गोष्ट कधी मित्राला सांगू नये मित्र दुश्मन झाला तर तो त्याचे भांडवल केल्याशिवाय राहत नाही. इथून पुढे ४०, ४५, ५० टक्क्याला किंमत राहणार नाही, अभ्यास करा चांगले मार्क घेऊन यशस्वी व्हा असा सल्ला त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला. याप्रसंगी परिसरातील भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# लातूरने कलाक्षेत्रात आंतरराष्ट्रीय दर्जाचे ख्यातनाम कलाकार घडविले - डॉ.राजेश इंगोले

### लातूर हे गुणवंतांची खाण - खासदार डॉ.शिवाजीराव काळगे

**तभा वृत्तसेवा**

अंबाजोगाई : इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूर द्वारा सांस्कृतिक कला महोत्सव नुकताच दयानंद हॉल येथे आयोजित करण्यात आला होता.



यावेळी सांस्कृतिक कला मंचावर उद्घाटक म्हणून इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले तर प्रमुख पाहुणे म्हणून लातूरचे खासदार सुप्रसिद्ध नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.शिवाजीराव काळगे व उपाध्यक्ष डॉ.कल्याण बरमदे हे होते. यावेळी कला मंचावर लातूर आयएमएचे स्थानिक अध्यक्ष डॉ.अभय कदम, सचिव डॉ.ऋषिकेश हरिदास, महिला अध्यक्ष डॉ.ज्योती सुळ व महिला सचिव डॉ.प्रियंका डावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन व नटराज मूर्ती पूजनाने झाली. आपल्या उद्घाटकीय भाषणात बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी लातूर येथे आलो की छत्रपती शाहू कॉलेजची आठवण होते, दिवंगत लोकनेते विलासरावजी देशमुख साहेबांची आठवण होते, जगप्रसिद्ध अशा सिद्धेश्वर यात्रेची आठवण होते असे म्हणतं लातूरच्या या भूमीने शैक्षणिक क्षेत्रात तर गुणवत्ताधारक दिलेचं परंतु, सांस्कृतिक कलाक्षेत्रातही दिग्गज असे जगप्रसिद्ध कलाकार घडविले. त्यामुळे कलेचा हा समृद्ध वारसा लातूर मधील डॉक्टरांना कलेचा वारसा जन्मजात हक्काने मिळाला असल्याचे सांगत येथील डॉक्टरांच्या अंगी सांस्कृतिक कला ही वारसा हक्काने मिळाली असल्याचे नमूद केले. अनेक डॉक्टरांमध्ये विविध कलाकार लपलेले असतात कुणी गायक असतो, कुणी कवी असतो, कुणी लेखक असतो, कुणी उत्कृष्ट नृत्य करतो, कुणी उत्कृष्ट फोटोग्राफी करतो, कुणी उत्कृष्ट चित्र काढतो आणि या अशा डॉक्टरांमधील कलाकार समाजापुढे आणण्यासाठी लातूर आयएमएची शाखा सदोदित कार्यरत असते या गोष्टींचा सांस्कृतिक समितीचा अध्यक्ष म्हणून मला नेहमीच कौतुक आणि गर्व वाटतो या शब्दांत लातूर आयएमएच्या या सांस्कृतिक कार्यक्रमाचे डॉ.राजेश इंगोले यांनी कौतुक केले. पैसा हा कदाचित जीवन जगण्यासाठी मदत करतो. परंतु, जीवनाला अर्थ प्राप्त करून देण्यासाठी आणि जीवनामध्ये प्रमोद्च्य सुख समाधान मिळण्यासाठी एखादी कला प्रत्येक व्यक्तीच्या अंगात जिवंत असणे गरजेचे आहे.

## जनविकास कडून २०० मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

केज/प्रतिनिधी : केज तालुक्यातील बेंगाळवाडी लिमुंदरा व चिंचोली माळी येथील संस्कार इंग्लिश स्कूल या गावच्या पाच शाळेतील पहिली ते पाचवी पर्यंतच्या गरीब गरजू निराधार अशा शाळकरी २०० मुलांना ओवेन्स कॉर्निंग व जनविकास सामाजिक संस्थे कडून शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले ज्यामध्ये स्कूल बॅग ड्रॉइंग सीट वही शैक्षणिक साहित्य पाणी बॉटल व स्पोर्ट मटेरियल ज्यामध्ये बॅट बॉल कॅरम बोर्ड चेंडू रिंग बॅडमिंटन बुद्धिबल व इतर स्पोर्ट मटेरियल साहित्य देण्यात आले. हे साहित्य देण्यामागचे कारण असे की



या दुर्गम भागातील शाळांना मुलांकडे शैक्षणिक साहित्य तसेच स्पोर्ट मटेरियल ची उपलब्धता नसल्याने त्यांच्या गुणवत्तेत व आरोग्यावरती कुठलाही परिणाम न होता त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात प्रगती करावी व त्यांचे आरोग्य सुदृढ राहावे हे साहित्य दिल्यानंतर मुलांच्या चेहऱ्यावरील हसू पाहून खूप आनंद झाला. यावेळी सर्व शाळातील शिक्षक मुले गावातील प्रतिष्ठित नागरिक महिला हे सर्वजण उपस्थित होते या शैक्षणिक साहित्य वाटपाच्या कार्यक्रमाबद्दल सर्वांनी संस्थेचे आभार मानले या कार्यक्रमासाठी सागर सर, रमेश भिसे, बाबा पोटभरे, शरद पवार, उत्तम गायकवाड, अभिजीत

# औंढ्यात महाशिवरात्रीनिमित्त दर्शनासाठी भाविकांच्या मध्यरात्रीपासून रांगा

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, आ. संतोष बांगर यांनी केली सपत्नीक नागनाथाची महापूजा, भाविकांची गर्दी







**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ फेब्रुवारी**
बारापैकी ज्योतिर्लिंगांपैकी आठवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू नागनाथाचा मंदिर परिसर महाशिवरात्री निमित्ताने भाविकांच्या गर्दीने गजबजून गेला. राज्यासह परराज्यातील हजारो भाविकांनी 'बम बम भोले', 'श्री नागनाथ महाराज की जय'चा जयघोष करत दर्शन घेतले. परिसरातील अनेक भाविक अनवाणी मंदिरामध्ये दाखल झाले होते.

हिंगोली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, उपविभागीय अधिकारी विकास माने,कळमनुरी विधानसभेचे आमदार संतोष बांगर सपत्नीक यांच्या हस्ते रविवारी मध्यरात्रीनंतर प्रभू नागनाथास दुग्धाभिषेक करून महापूजा केली. महापूजेनंतर मध्यरात्रीनंतर दोनच्या सुमारास भाविकांच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले. नागनाथ मंदिर फुलांनी सजविण्यात आले. तसेच नागनाथ मंदिरावर विद्युत रोषणाई देखील करण्यात आली. नागनाथाचे दर्शन घेण्यासाठी मध्यरात्रीपासूनच भाविकांच्या रांगा लागल्या होत्या.

हर हर महादेव ...बम बम बोले चा गजर करत भाविकांनी नागनाथ प्रभू चे दर्शन घेतले. मुख्यपुजारी तुळजादास भोपी, पद्माक्ष पाठक,जीवन ऋषी,बंडू पंडित,आबागुरू बल्लाळ, कृष्णा ऋषी, संजय पाठक,गौरव पुराणिक, कल्याण पुराणिक यांनी महा-पूजेची आवर्तने म्हटली.देवस्थानचे अध्यक्ष तथा तह-सीलदार हरीश गाडे, देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, पोलीस निरीक्षक जी एस राहिरे, सपोनी कैलास भगत, नायब तहसीलदार प्रवीण ऋषी, तलाठी गजानन गुंजकर, नितीश कुलकर्णी कृष्णा पाटील नागेश माने बबन सोनुने, मुकेश पडोळे, जगदीश दिंडे, सुरेखा शिंदे, प्रवीण गोबाडे, नंदा चोडेकर शोभा जोशी, देवा देशमुख, गणेश जगताप, बाळू देशमुख यांनी नागनाथ मंदिरामध्ये दिवसभर तळ ठोकून होते.



भाविकांची गर्दी लक्षात घेता अभिषेक पूजा बंद करण्यात आली होती. महाराष्ट्रासह गुजरात, आंध्र प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक राज्यातील भाविकही दर्शनासाठी औंढा नागनाथ येथे दाखल झाल्याचे पहायला मिळाले. रांगेत उभ्या असलेल्या भाविकांना पिण्याचे पाणी, तसेच २५ क्विंटल साबुदाणा खिचडी वाटप करण्यात आली. रविवारी सात वाजता नागना-थाची पालखी मिरवणुक काढली जाणार असून त्यानंतर लेझर ड्रोन शो होणार आहे. मागील वर्षीपेक्षा यावर्षी भाविकांची गर्दी वाढली असून दुपारपर्यंत ४० हजाराहून अधिक भाविकांनी नागनाथ प्रभूंचे दर्शन घेतले होते.

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस अधीक्षक निलभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली औंढ्याचे पोलीस निरीक्षक जी एस राहिरे यांनी नागनाथ मंदिरामध्ये कडक बंदोबस्त ठेवला होता. नागनाथ मंदिरामध्ये महाशिवरात्री निमित्ताने लाखो भाविकांनी रांगेमध्ये दर्शन घेतले. हर हर महादेव...! बम बम भोले...! जयघोषाने नागनाथ मंदिर परिसर भक्तीमय झाला होता.

# काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळांच्या वक्तव्याचा निषेध

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ फेब्रुवारी**
येथील गांधी चौक येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने दि १५ फेब्रुवारी रोजी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेल्या वक्तव्याचा निषेध करीत त्यांना तत्काळ बडतर्फ करण्याची मागणी भाजपकडून करण्यात आली.



छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना करून त्यांना समकक्ष ठरवण्याचा जो दुर्दैवी व आक्षेपार्ह प्रकार काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला ते केवळ ऐतिहासिक अज्ञानच नव्हे तर महाराष्ट्राच्या अस्मितेवर थेट घाला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना जबरदस्तीने धर्मांध राजवटीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या टीपू सुलतानशी करणं म्हणजे इतिहासाचा अपमान आहे.काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी केलेल्या या विधानाबद्दल संपूर्ण महाराष्ट्रातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. अशा व्यक्तीला महाराष्ट्रात राहण्याचा नैतिक अधिकार नाही. त्यांच्या विधानाबद्दल केवळ माफी नव्हे, तर काँग्रेस पक्षाने त्यांच्यावर तात्काळ कारवाई करून बडतर्फ करावं.याकरिता निषेध करण्यात आला यावेळी जिल्हाअध्यकक्ष गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, शहर अध्यक्ष रजनीश पुरोहित, प्रंशात सोनी, नगरसेवक उमेश गुठ्ठे, कैलाश शहाणे,संदीप वाकडे ,पवन उपाध्याय, विलास गोरे, बाबा घुगे, संजय ढोके, सदाशिव सुर्यतळ, विश्वास बांगर, शंकर जोजार, गुड्डु देवकते, निखिल बांगर, लखन कुरिल, संजय पाठक यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**हिंगोली- छत्रपती शिव जयंती महोत्सव समितीच्यावतीने येथील छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पूतळ्यापासून रविवारी महिला व मुलींची मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या मॅरेथॉन स्पर्धेत अनेकांनी सहभाग घेतला होता. छाया- सुनील पाठक**


## संक्षिप्त वृत्त

### पुलवामामधील शहीद जवानांना श्रध्दांजली



हिंगोली- १४ फेब्रुवारी रोजी जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात मोठ्या संख्येने भारतीय सैनिक शहीद झाले. हिंगोली शहरात या शहीद जवानांना सन्मानित करण्यात आले. शनिवारी सकाळी शहरातील रामलीला मैदानावर पत्रकार क्रिकेट संघटना आणि वन विभागाच्या टीमने शहीद जवानांना आदरांजली वाहण्यासाठी दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सुनील पाठक, प्रसाद आर्विकर, विजय पाटील, विजय गुंडेकर, शिवाजी मेटकर, राकेश भट्ट, विलास गोरे, संजय पवार, सुनील नागरे, सुमित जैन, गोपाल सरनाईक, दिलीप हळदे, सुधीर गोगटे, सुधाकर वाढवे, प्रीतम राठोड, संतोष आठवले आणि इतर उपस्थित होते. प्रद्युम्न गिरीकर यांनी कार्यक्रमाची ओळख करून दिली.

### आदर्शमध्ये संत सेवालाल जयंती साजरी



हिंगोली- येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बंजारा समाजाचे आराध्य दैवत, क्रांतिसिंह, समाजप्रबोधक, संत शिरोमणी श्री सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे होते. याप्रसंगी प्रो. डॉ. विलास आघाव यांच्या शुभहस्ते व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य डॉ. सुरेंद्र साहू, प्रो. डॉ. पांडुरंग गंगासागरे, प्रा. डॉ. अण्णाजी मडावी, प्रा. डॉ. बस्वराज लक्षटे, प्रा. डॉ. सुभाष पोले, प्रा. डॉ. महेश मगनाळे, प्रा. डॉ. तुकाराम आडे, प्रा. निलेश उबाळे, प्रा. वर्षा सावतकर, प्रा. सपना पुपुलवाड, संजय राठोड, आशिष परदेशी, मदन बैस, लता शिंदे इत्यादी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. तुकाराम आडे यांनी केले.

### महाशिवरात्री निमित्त जलेश्वर मंदिरात गर्दी

हिंगोली- शहरातील अतिप्राचीन जलेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती.

# शिवजयंती महोत्सवानिमित्त मंगळवारी वेशभूषा व नृत्य स्पर्धांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ फेब्रुवारी**
येथील सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त निमित्ताने १७ फेब्रुवारी मंगळवार रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात दुपारी १२ वाजता स्पर्धा होणार आहेत.

येथील सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त निमित्ताने शहरात विविध कार्यक्रम सुरू आहेत. १७ फेब्रुवारी मंगळवार रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात दुपारी १२ वाजता वेशभुषा स्पर्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धा दोन गटात होणार आहेत बालगटात होणार्या या स्पर्धा स्पर्धेचे प्रथम पारितोषीक ११०० रुपये, द्वितीय पारितोषीक ७०० रुपये, तृतीय पारितोषीक ५०० रुपये, प्रोत्स-ाहनपर २०० रुपये असे ठेवण्यात आले आहेत. खुल्या गटात होणार्या स्पर्धेचे प्रथम पारितोषीक २१०० रुपये, द्वितीय ११०० रुपये, तृतीय ५०० रुपये, प्रोत्साहनपर ३०० रुपये असे ठेवण्यात आले आहेत. नृत्य स्पर्धा दुपारी २ वाजता होणार आहे. यामध्ये खुल्या गटात होणार्या समुह नृत्य स्पर्धेचे प्रथम पारितोषीक ३ हजार रुपये, द्वितीय २ हजार रुपये, तृतीय १ हजार रुपये असे ठेवण्यात आले आहे. बाल गटात होणार्या वैयक्तीक नृत्य स्पर्धेचे प्रथम पारितोषीक ११०० रुपये, द्वितीय ७०० रुपये, तृतीय ५०० रुपये असे ठेवण्यात आले आहेत. वैयक्तीक नृत्य मोठा गट प्रथम पारितोषीक २१०० रुपये, द्वितीय ११०० रुपये, तृतीय पारितोषीक ५०० रुपये ठेवण्यात आले आहे.स्पर्धेचे प्रायोजक डॉ. सौ. माधुरी देशमुख, सौ. उषाकिरण गायकवाड ह्या आहेत. स्पर्धा समितीत अर्चना जाधव, अनिता सुर्यतळ, रेखा बोरकर, प्रणिता कौलवाल यांचा समावेश आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षा सुनिता मुळे, सचिव रजनी पाटील, कार्याध्यक्षा स्वाती भोयर, कोषाध्यक्षा कांताबाई कल्याणकर यांनी केले आहे.

# आंतरराष्ट्रीय जन्मजात दोष परिषदेत डॉ. गोपाल कदम यांनी केले सादरीकरण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ फेब्रुवारी**
पूणे येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय जन्मजात दोष परिषदेत हिंग-ोली येथील बालरोग तज्ज्ञ डॉ गोपाल कदम यांनी जन्मजात दोष व त्यावर करण्यात आलेल्या उपाययोजना यावर सादरीकरण केले. या परिषदेत विविध देशांच्या प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला होता.



भारत सरकार, युनीसेफ, दक्षिण आशिया जिनोमीक हेल्थकेअर अलायन्स, जिनोमीक मेडीसीन फाऊंडेशन युनायटेड किंगडम यांच्या संयुक्त विद्यमाने या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि १२ ते १४ फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले होते. या परिषदेत हिंगोलीचे बालरोग तज्ज्ञ डॉ गोपाल कदम यांनी सहभाग घेतला होता. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम पथक व डीईआयसी मार्फत शोधण्यात आलेल्या नवजात व १८ वर्षाखालील बालकांना असलेले जन्मजात दोषांबाबतीत व त्यावर करण्यात आलेल्या सुधारात्मक शस्त्रक्रिया आणि उपाययोजनाचे सादरीकरण केले. विविध जन्मजात दोषांवरील शस्त्रक्रियांकरिता लागणारा निधी केंद्र शासन व राज्य शासनामार्फत विविध आरोग्य योजनांतून कसा उप-लब्ध होवू शकतो याचे सादरीकरण व मार्गदर्शन करण्यात आले. पुढील काळात भारतामध्ये जन्मजात व्यंगावर नवजात शिशु काळामध्ये स्क्रिनींग टेस्ट करून वेळीच ओळखता यावे यासाठी विस्तृत चर्चा झाली. या चर्चेत जिनोमीक मेडीकल फाऊंडेशनचे युकेचे प्रमुख डॉ देवेंद्रकुमार, पद्मश्री कुमारस्वामी थंगराज, डॉ मृदूला फडके, माजी कुलगुरू डॉ सिमीन इराणी, युनीसेफचे डॉ प्रमिला मेनन, डॉ शुभा फडके, डॉ डायना बॅरल, डॉ इमा बॅपल, डॉ चित्तरंजन यागनिक आदींनी सहभाग नोंदविला होता.

# अवैध वाळू वाहतुक करणारे दोन हायवा, एक ट्रॅक्टर पकडले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ फेब्रुवारी**
पोलिस विभागाने देवाळा फाटा रोड, नालेगाव परिसर तसेच पळसगाव पाटी येथे अवैध वाळू वाहतुक करणारे दोन हायवा व एक ट्रॅक्टर पकडून सुमारे ३५ लाख ८५ हजारांचा मुद्देमाल जप्त करीत गुन्हा दाखल केला आहे.



पोलिस अधीक्षक डॉ निलभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्या पथकाने दि १५ रोजी मिळालेल्या गोपनीय माहीतीवरून देवाळा फाटा येथील रोडवर हायवा टिप्पर अवैधरित्या रेतीची वाहतुक करीत असतांना मिळून आल्याने त्यास पकडून चालक दत्ता यादवराव कुटे तसेच दुसरा चालक सुनील सांगळे व सदर टिप्परला संरक्षण देणारी स्वीफ्ट डिझायर एमएच १२ ए एक्स ००१७ चा चालक यांच्याविरूध्द औंढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पथकाने आरोपीच्या ताब्यातून एक हायवा व २ ब्रास वाळू असा १५ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दुसरी कार्यवाही जवळा बाजार हद्दीतील नालेगाव परिसरात एक ट्रॅक्टर अवैधरित्या वाळूची वाहतुक करीत असतांना मिळून आल्याने चालक अरबाज खान मोईन खान पठाण यास ट्रॅक्टरसह ताब्यात घेवून वाळू असा एकूण ५ लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तिसरी कार्यवाही वसमत तालुक्यातील पळसगाव पाटीजवळ पेट्रोलिग करीत असतांना एका टिप्परमध्ये अवैधरित्या वाळू वाहतूक होत असल्याचे मिळून आल्याने चालक अमोल राजू कानोजी यास टिप्पर व अवैध वाळूसह ताब्यात घेवून १५ लाख १० हजारांना मुद्देमाल जप्त केला आहे. ती-नही ठिकाणी आरोपीविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# मारहाणीत गंभीर तरूणाचा उपचारादरम्यान मृत्यू, मृतदेह पोलिस ठाण्यात आणला

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ फेब्रुवारी**
हिंगोलीत किरकोळ कारणातून दोन गटाच्या मारहाणी मध्ये जखमी झालेल्या तरुणा-चा उपचारादरम्यान छत्रपती संभाजीनगरमध्ये मृत्यू झाला. शेख कलीम शेख सलीम असे या मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव असून नातेवाईकांनी या प्रकरणात तातडीने आरोपी अटक करण्याची मागणी करत मृतदेह पोलीस स्टेशनच्या दारात आणून ठेवला. शेकडो नातेवाईक हिंगोली शहर पोलीस स्टेशनच्या पुढे जमले होते. आरोपींना अटक केल्याशिवाय मृतदेह अंत्य संस्कारासाठी घेऊन जाणार नाही असा पवित्रा नातेवाईकांनी घेतला. आपल्या मुलाचा काही एक गुन्हा नसताना वीस ते पंचवीस जणांनी धारदार शस्त्राने वार केल्याचं मृत्यू झालेल्या तरुणाच्या वडिलांनी सांगितले आहे.



दरम्यान नातेवाईकांच्या आंदोलनानंतर पोलिस निरीक्षक संदीप मोदे यांनी मुख्य आरोपीला अटक केल्याची माहिती दिली. चार आरोपी अटक असून इतर आरोपींना सुद्धा अटक करण्यासाठी पथके पाठवले असल्याचे सांगितले तसेच लेखी आश्वासन दिले. त्या नंतर नातेवाईक मृतदेह अंत्यविधीसाठी घराकडे घेऊन गेले आहे या सगळ्या प्रकारामुळे मात्र पोलीस स्टेशनच्या परिसरात गोंधळ उडाला होता.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# देगलूरात शहीदांच्या स्मृतींची अवहेलना !

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १५ फेब्रूवारी-**



देगलूर येथील शहिद जवान व स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झालेल्या सैनिकांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या स्मारकांवर अक्षरशः कुत्र्याचा संचार होत आहे. तसेच पोलिस ठाण्यासमोरील स्मारकावरील तब्बल सात पथदिव्यापैकी केवळ एकच चालू आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त याठिकाणी रोषणाई करण्यात आली मात्र पथदिव्यांची दैयनीय अवस्था नगरपरिषदेच्या प्रशासनाला दिसली नाही, ही मोठी शोकांतिका आहे. नगरपरिषदेकडे इतर कामे करण्यासाठी आर्थिक बजेट आहे पण स्मारकांच्या सन्मानासाठी नाही का? सध्या देगलूर नगरपरिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आहे, यांच्या कार्यकाळात तरी स्मारकांना न्याय मिळणार का ? असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**स्मारक झाले कुत्र्यांचे निवासस्थान?**

राष्ट्राच्या स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झालेले व्यक्ती आणि देशाच्या रक्षणार्थ शहिद झालेले जवान भावी पिढ्यांना प्रेरणा देत असतात. ही स्मारके राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रस्वाभिमानाची शिकवणूक देतात. सध्या देगलूर शहरात विविध महापुरुषांची स्मारके उभारण्यात आली आहेत, त्यात राष्ट्रपिता महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा बसवेश्वर महाराज आणि साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या स्मारकांचा समावेश होतो, याठिकाणी दरवाजे बसविल्याने मोकाट कुत्र्यांपासून संरक्षण होत आहे. परंतु देगलूर शहरातील पोलीस स्टेशनसमोरील स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी झालेल्या सैनिकांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेले स्मारक व शहिद अब्दुल हमीद स्मारकाला दरवाजा न बसविल्यामुळे या स्मारकांवर मोकाट कुत्र्यांचा संचार होत असून याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. विशेषतः लाखो रुपयांची स्मारके उभारली परंतु या स्मारकांना दरवाजे नसल्याने अक्षरशः कुत्र्यांचे निवासस्थान झाले आहे. तर कॅप्टन डॉ. मनोज काशिनाथ अप्पा दयाडे या स्मारकाचे लोखंडी कम्पाऊंड कमी उंचीचे असल्याने येथेही कुत्र्याचे संचार होत असल्याचे दिसून आले आहे. तसेच या स्मारकाच्या आजूबाजूला गाड्या, विट आणि कपडे पहावयास मिळतात. विशेषतः हे स्मारक तहसीलदार निवासस्थानाच्या समोर आहे. विशेष म्हणजे, स्मारकाला परिसरात अस्वच्छता, घाण आणि दुर्गंधी पसरलेली पहावयास मिळते. या स्मृती जपण्याऐवजी त्यांच्या स्मारकाची ही अत्यंत वेदनादायक अवस्था असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

**राष्ट्रवादीकडून ठोस निर्णयाची अपेक्षा!**

देगलूर नगरपरिषदेवर सध्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचीची सत्ता आहे. त्यामुळे सत्ताधाऱ्यांवर जबाबदारी अधिक वाढली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शिवराय-फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांचे वारसदार असल्याचा दावा करते; अशा वेळी स्मारकांचे जतन आणि सन्मान राखणे ही राष्ट्रवादीची नैतिक जबाबदारी ठरते. यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते लक्ष्मीकांत पदमवार, नगराध्यक्षा सौ विजयमाला बालाजी टेकाळे, उपनगराध्यक्ष ॲड अंकुश देसाई देगावकर आणि नगरसेवक नक्कीच सकारात्मक भूमिका घेतील, अशी दाट शक्यता आहे. आज होणाऱ्या सर्वसाधारण सभेत स्मारकांवर कुत्र्यांचा संचार होऊ नये, म्हणून राष्ट्रवादी पक्ष महत्त्वाचा निर्णय घेईल. या निर्णयास विरोध पक्षाकडून स्वागतच होईल, अशी चिन्हे दिसत आहेत.

**उपजिल्हाधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज**

देगलूर येथील उपजिल्हाधिकारी अनुप पाटील व त्यांचे सहकारी नेहमीच राष्ट्रभक्ती आणि देशप्रेम याबद्दल जागरूक असतात. विविध सामाजिक उपक्रम घेत राष्ट्रीय सण उत्सव साजरे करीत असतात. यापुर्वीही उपजिल्हाधिकारी कार्यालयामार्फत माझी सैनिक, स्वातंत्र्य सैनिक यांचा सन्मान करण्यात आला आहे. त्यामुळे देगलूर येथील स्मारकांच्या संदर्भात उपजिल्हाधिकारी अनुप पाटील यांनी लक्ष दिल्यास स्मारकांवर मोकाट कुत्र्यांचा होणारा संचार थांबू शकेल.

**विद्यार्थी व तरुणांनाकडून स्मारकास दरवाजे बसविण्याची मागणी**

शहरातील ही स्मारके विद्यार्थी व तरुण वर्गाला राष्ट्रप्रेम व देशभक्तीची प्रेरणा देत असतात. विशेषतः ही स्मारके पोलिस ठाणे, न्यायालय, पोस्ट ऑफिस आणि तहसीलदाराचे निवासस्थान या परिसरात आहेत. या कार्यालयास हजारो लोक येत असतात. त्याचबरोबर या परिसरातून अनेक विद्यार्थी शाळा, कॉलेज आणि शिकवणी वर्गाला जात असतात. मग विद्यार्थी व तरुणांनाकडून यापुर्वीही स्मारकांना दरवाजा बसवून कुत्र्यांचा संचार थांबवावे, ही मागणी करण्यात आली. याठिकाणी लाखो रुपयांचे स्मारके उभारण्यात आले पण हजारोंच्या घरात असलेले दरवाजे बसविले नाहीत. ही बाब विद्यार्थी आणि तरुणांना निश्चितच आवडणार नाही. मग या छोट्याशा कामासाठी विद्यार्थी आणि तरुणांनी निवेदन दिल्यास नगरपरिषदेच्या प्रशासनाचे काय राहिल? त्यामुळे बुंद से गई, तो हौद बाटने से आएगी क्या? अशी अवस्था नगरपरिषदेच्या प्रशासनाची होऊ शकते.

**लोक निधीतून काम करण्याची वेळ येऊ नये**


नगरपरिषदेच्या प्रशासनाकडून या स्मारकांच्या प्रश्नांकडे इतके दुर्लक्ष का करीत आहे? यासंदर्भात अनेकदा बातम्या प्रसारित होऊनही उदासीनता कशासाठी? ही बाब केवळ स्मारकांचे पथदिवे आणि दरवाजापुरती मर्यादित नाही तर ही राष्ट्रस्वाभिमानास वाढविणारी बाब आहे. याची जाणीव मुख्याधिकारी निलम कांबळे व प्रशासनास होणे आवश्यक आहे. यासंदर्भात सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व नगरपरिषद पुढाकार नाही घेतल्यास शेवटी देगलूरवासी पुढे येतील. लोकांकडून निधी जमा करुन स्मारकांस दरवाजे व पथदिवे बसवतील. ज्यामुळे कुत्र्यांपासून संरक्षण आणि पथदिव्यांची रोषणाई होऊन स्मारकांचा सन्मान वाढवतील हे मात्र निश्चित!

# किनवट येथे २८ कोटींचे पोलीस निवासस्थान मंजूर

## १८ महिन्यांत ७० निवासांची पाच मजली इमारत उभारणार : आमदार केराम

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १५ फेब्रूवारी-**

येथील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी सुसज्ज निवासस्थान उभारण्यासाठी २७ कोटी ६६ लाख ४ हजार ४७२ रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निधी मिळाल्याची माहिती आमदार भीमराव केराम यांनी पत्रकार परिषदेत दिली.





या प्रकल्पांतर्गत पाच मजली इमारत उभारण्यात येणार असून त्यामध्ये एकूण ७० निवासस्थानांचा समावेश असेल. त्यापैकी ६ निवास पोलीस अधिकाऱ्यांसाठी तर ६४ निवास पोलीस कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध असतील. निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून नांदेड येथील कंत्राटदाराला कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. लवकरच भूमिपूजन सोहळा पार पडणार असून पुढील १८ महिन्यांत बांधकाम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

राष्ट्रीय सण, धार्मिक उत्सव, पूरस्थिती तसेच विविध आपत्ती व्यवस्थापनाच्या काळात पोलीस कर्मचारी दिवस-रात्र कर्तव्य बजावत असतात. मात्र अनेक वर्षांपासून त्यांच्यासाठी पुरेशी निवास व्यवस्था नसल्याने कुटुंबासह राहण्यास अडचणी निर्माण होत होत्या. हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार केराम यांनी शासनदरबारी पाठपुरावा केला होता. यापूर्वी किनवट येथे नवीन पोलीस ठाण्याची इमारत उभारण्यात आली असून आता या निवास प्रकल्पामुळे शहराच्या विकासात भर पडणार आहे.

दरम्यान, पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी पोलीस कर्मचाऱ्यांच्या वतीने आमदार केराम यांचे आभार मानले.

**निवासाचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार :आमदार केराम**

पोलीस बांधव नागरिकांच्या सुरक्षेसाठी अहोरात्र रस्त्यावर असतात. त्यांच्या कुटुंबाला सुरक्षित व सन्मानाने राहता यावे ही आमची जबाबदारी आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर किनवटमधील पोलीस कर्मचाऱ्यांचा निवासाचा प्रश्न कायमचा सुटेल, असे आमदार भीमराव केराम यांनी सांगितले.

# पंढरीनाथ बोकारे यांना जीवन गौरव पुरस्कार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ फेब्रूवारी-**



पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय, निष्ठावान व दीर्घकालीन कार्याची दखल घेत स्मॉल अँड मिडीयम न्यूजपेपर असोसिएशन, महाराष्ट्र तर्फे नांदेड येथील ज्येष्ठ पत्रकार तथा नानक साई फाऊंडेशन चे प्रमुख पंढरीनाथ बोकारे यांना प्रतिष्ठेचा जीवन गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

वरोरा येथे शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित राज्यस्तरीय पत्रकारांचे एकदिवसीय खुले अधिवेशन या भव्य कार्यक्रमात हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन नगर भवन, हनुमान वॉर्ड, वरोरा, जि. चंद्रपूर येथे करण्यात आले आहे.

पंढरीनाथ बोकारे यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील घडामोडींचे सत्य, निष्पक्ष व निःस्वार्थपणे चित्रण करत पत्रकारितेला नवे मूल्य व दिशा दिली आहे. याचबरोबर पंजाब आणि महाराष्ट्रात बंधुभाव, सामाजिक सलोखा व एकात्मतेची भावना दृढ करण्यासाठी नानक साई फाऊंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये पंढरीनाथ बोकारे व त्यांच्या टीमची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे मत असोसिएशनतर्फे व्यक्त करण्यात आले आहे.

हा पुरस्कार असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष उत्तमराव वाडकर, राष्ट्रीय सचिव ईश्वरसिंह सेंगर, कार्याध्यक्ष योगेश तुरेराव, राज्य अध्यक्ष संतोष धरमकर (महाराष्ट्र) व राज्य सचिव आशिष घुमे यांच्या निवड समितीमार्फत जाहीर करण्यात आला आहे.

## प्रा. भास्कर पवार नेट परीक्षा उत्तीर्ण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ फेब्रूवारी-**

विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी), दिल्ली यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय पात्रता (नेट - डिसेंबर २०२५) परीक्षेत प्रा. भास्कर पवार यांनी ग्रंथालयशास्त्र या विषयात नेट परीक्षा उत्तीर्ण होऊन आपली शैक्षणिक पात्रता सिद्ध केली आहे.

यापूर्वी त्यांनी एम.ए. मानवअधिकार - नेट, राज्यशास्त्र - नेट, सेट तसेच ग्रंथालयशास्त्र - सेट परीक्षा उत्तीर्ण केल्या आहेत. विविध विषयांमध्ये नेट व सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे प्रा. भास्कर पवार यांचे शैक्षणिक, प्रशासकीय, सामाजिक क्षेत्रातून कौतुक होत आहे.

# मुदखेड येथील केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालयात शहीदांना श्रद्धांजली

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १५ फेब्रूवारी-**

दि.१४ फेब्रुवारी २०२६ रोजी मुदखेड येथील केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालयात पुलवामा दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या शहीदांना श्रद्धांजली वाहण्यासाठी एक भव्य समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या समारंभात, संस्थेचे प्राचार्य आर. गोपाळ कृष्ण राव, आयपीएस, महानिरीक्षक यांनी शहीद स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून शूर सैनिकांना श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर विशेष रक्षकांनी शहीदांना औपचारिक अभिवादन केले. उपस्थित



अधिकारी, अधीनस्थ अधिकारी आणि सैनिकांनीही शहीद स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

पुलवामा येथील या भ्याड दहशतवादी हल्ल्यात, केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या ४० शूर सैनिकांनी देशाचे रक्षण करताना सर्वोच्च बलिदान दिले. त्यांच्या अदम्य धैर्याला, समर्पणाला आणि मातृभूमीप्रती असलेल्या अटळ भक्तीला राष्ट्र विनम्र श्रद्धांजली अर्पण करते. शहीदांचे हे बलिदान राष्ट्राच्या एकता, अखंडता आणि सुरक्षेसाठी आपली वचनबद्धता अधिक मजबूत आणि प्रेरणा देते. यावेळी व्ही.पी. त्रिपाठी, कमांडंट आणि संस्थेचे इतर अधिकारी, कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. त्यांनी दोन मिनिटे मौन पाळले आणि शूर शहीदांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

# पाचोंदा दुहेरी खून प्रकरणी आरोपी विरोधात ॲट्रॉसिटी कलमवाढीसाठी आमरण उपोषण

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १५ फेब्रूवारी-**

माहूर तालुक्यातील पाचोंदा येथील दोन दलित महिलांची शेतात काम करत असताना निर्घृणपणे हत्या करून गळ्यातील सोने लुटल्याची धक्कादायक घटना २० नोव्हेंबर २०२५ रोजी घडली होती. या घटनेमुळे माहूर तालुकाच नव्हे तर नांदेड जिल्ह्यासह संपूर्ण राज्य अक्षरशः हादरले होते.

या दुहेरी खूनाच्या घटनेतील दोन आरोपींच्या अवघ्या १२ तासांच्या आत मुसक्या आवळत अटक करण्यात पोलिसांना यश देखील मिळाले होते. मात्र त्यानंतर या खून प्रकरणात आणखी एक ट्विस्ट निर्माण होऊन आरोपी विरोधात ॲट्रॉसिटी कलमवाढ करावी, अशी मागणी मयत महिलांच्या दोन मुलांनी पोलिसांपुढे लावून धरली होती. मात्र याबाबतीत पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी यांचे दुर्लक्ष होत असल्याचे सांगत आता खून झालेल्या दोघी मयत महिलांच्या दोन मुलांनी

आपल्या मयत आईच्या आत्म्याला पुरेपूर न्याय मिळवून देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड समोर १२ फेब्रुवारी पासून लोकशाही मार्गाने आमरण उपोषण सुरू केले आहे.

माहूर तालुक्यातील दुर्गम डोंगराळ भागातील पाचोंदा येथील या दुहेरी खूनाच्या घटनेत बौध्द समाजातील अंतकला आढागळे आणि अनुसयाबाई आढागळे या सख्या दोघी जावांचा निर्घृन खून करून गळ्यातील मंगळसूत्र व इतर दागिने चोरून नेले होते. यातील दोन आरोपींना पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार १२ तासाच्या आत अटकही करण्यात आली होती. विशेष म्हणजे यातील एक आरोपी गजानन येरजवार हा पाचोंदा गावाजवळील गावचा रहिवासी असून त्याचे नेहमीसाठी पाचोंदा येथे येणे जाणे होते. तो मयत महिलांना पूर्वीपासून ओळखत होता. असा लेखी जवाब गावातील सरपंच विलास तोरकड व इतर प्रतिष्ठित लोकांनी पोलीस ठाणे माहूर येथे लेखी स्वरूपात ३० नोव्हेंबर रोजी दिला आहे.

दोन्हीही मयत महिलांच्या मुलांनी दि. १५ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस निरीक्षक माहूर यांना लेखी निवेदन देऊन खुनातील आरोपी




विरुद्ध ॲट्रॉसिटी व मोका अंतर्गत गुन्हा दाखल करून कलम वाढ करण्याची मागणी केली असून, वेळोवेळी लावून धरली आहे.

तर माकप सचिव कॉ.गंगाधर गायकवाड यांनीही पोलीस अधीक्षक यांना प्रत्यक्षात भेटून सदरील प्रकरणी लक्ष वेधले होते व कलम वाढ करावी, अशी लेखी मागणी केली होती. तेव्हा सरकारी वकिलांचे मार्गदर्शन मागवून कलम वाढ करण्यात येईल असे पोलीस अधीक्षक यांनी कळविले होते.परंतु अद्याप कलम वाढ होत नसल्याने खून झालेल्या दोन्हीही महिलांच्या मुलांनी नामे नागेंद्र साहेबराव आढागळे व विकास अशोक आढागळे रा. पाचोंदा ता.माहूर यांनी १२ फेब्रुवारी पासून जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड समोरआपल्या मयत आईच्या आत्म्याला न्याय मिळवून देण्यासाठी बेमुदत आमरण उपोषण सुरु केले असून त्या उपोषणास मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व डीवायएफआयच्यावतीने जाहीर पाठिंबा दिला आहे. पीडित उपोषणार्थिंच्या मागण्या जर पूर्ण झाल्या नाहीत तर तीव्र आंदोलन छेडणार, असा इशारा देखील उपरोक्त पक्ष संघटनेने दिला आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डीले व पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांनी याबाबत स्वतः लक्ष घालून पीडितांना न्याय द्यावा अशी मागणी होत आहे.

## राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या पुतळा संदर्भात अमरण उपोषण करण्याचा इशारा

**नांदेड**-राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचा भव्य पुतळा नांदेड शहरामध्ये उभारावा, अन्यथा १ मार्चपासून नॅशनल धोबी महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष संतोष औंढेकर हे अमरण उपोषण करणार असल्याचे निवेदन महानगरपालिका आयुक्त यांना देण्यात आले. तसेच राज कॉर्नर ते आसना या मार्गास राष्ट्रसंत गाडगेबाबा रोड नं. ३६ असे नामकरण तत्कालीन मनपा महापौर अजयसिंह बिसेन यांच्या कार्यकाळात नियोजन समितीच्या बैठकीमध्ये ठराव मंजूर करण्यात आला होता. तसे परिपत्रक काढण्यात आले होते, परंतु मागील १५ वर्षांपासून या मार्गाच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले नाही, ते नामफलक गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीदिनी म्हणजे २३ फेब्रुवारी पूर्वी करण्यात यावे. तसेच चैतन्यनगर शिवमंदिराच्या बाजुला जे उद्यान झाले त्या उद्यानाला राष्ट्रसंत गाडगेबाबा नाव देऊन तेथे भव्य पुतळा उभारण्यात यावा किंवा जुना मोंढा टॉवरमध्ये राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचा पुतळा उभारण्यात यावा, अन्यथा दि. १ मार्चपासून मनपासमोर अमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला. निवेदन देताना नॅशनल धोबी महासंघाचे वामनराव पेनुरकर, किशनराव खतगावकर, गोविंदराव कुंटूरकर कोंडीबा मांजरमकर, लक्ष्मण कापसे, पिंटूभाऊ मारवाडीकर, प्रमोदभाऊ भंडारे, रवीसिंघ खालसा, उद्धव बगाटे, माधवराव तेलंग, विठ्ठल होळकर, मार्तंड भंडारे, आकाश झाडे, कैलासभाऊ तेलंग, शंकर कापसे, रामप्रसाद हिवरेकर यांच्यासह महासंघाचे अनेक कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी कदम तर उपाध्यक्षपदी राईकवाडे

**लोहा** -लोहा तालुक्यातील सावरगाव (न) येथील जि. प. प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी जगदीश कदम तर



उपाध्यक्षपदी विठ्ठल राईकवाडे यांची पालक मेळाव्यातुन बिनविरोध निवड करण्यात आली. १३ फेब्रुवारी रोजी पालक मेळाव्यात आयोजन करुन ही निवड सर्वानुमते जाहीर करण्यात आली. सदस्य म्हणून विरभद्र भानुदास राईकवाडे, सौ. सुरेखा अरुण कदम, सौ. मनिषा दत्ता पवळे, संतोष चांदू भावे, सौ. अनुसया पिराजी हाके, राहूल बापुराव कदम, सौ. प्रभावती संभाजी बोईनवाड, सौ. कुंताबाई जीवनराव कदम, विठ्ठल सोमनाथ स्वामी यांची निवड करण्यात आली आहे. तसेच शिक्षण तज्ञ म्हणून शंकर पंडीतराव कदम, शिक्षक प्रतिनिधी म्हणून सौ. मनिषा ज्ञानोबा माने आणि सचिव तथा मुख्याध्यापक म्हणून भुजंग भगवानराव खेडकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.या निवडीच्या वेळी माजी. उपसभापती बालाजी पाटील कदम, माजी. सरपंच अनुसया बालाजी भावे, माधवराव बेंद्रे, विठ्ठलराव बेंद्रे, बजरंग पाटील कदम, पंडीत कदम, बापुराव बेंद्रे, अरुण बेंद्रे, भरत पाटील कदम, अंकुश पाटील कदम, संदीप पाटील कदम, सतिश स्वामी, संजय दगडगावे यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामतीर्थ पोलिसांची धडाकेबाज कारवाई; एटीएम फोडणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १५ फेब्रूवारी-**

तालुक्यातील रामतीर्थ पोलीस स्टेशन हद्दीत ऑक्टोबर महिन्यात घडलेल्या एसबीआय एटीएम चोरी प्रकरणाचा अखेर उलगडा करण्यात रामतीर्थ पोलिसांना यश आले आहे. शंकर नगर येथील एसबीआय एटीएम केंद्र कट करून लाखो रुपयांच्या चोरीचा प्रयत्न करणाऱ्या दोन आरोपींना पोलिसांनी संभाजीनगर येथून अटक केली आहे.



रामतीर्थ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ३१३/२०२५ प्रमाणे सदर गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेनंतर पोलिसांनी तातडीने तपासाची सूत्रे हाती घेत विविध ठिकाणी तपासाची चक्रे फिरवली. तांत्रिक माहिती, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात आला. अखेर पोलिसांनी अचूक नियोजन करत संभाजीनगर येथे सापळा रचून दोघांनाही अटक केली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत मोहम्मद कैफ नजमुद्दीन (वय २१ वर्षे),रा. उलेता, ता. फिरोजपूर, जि. नुहू, राज्य हरियाणा.आझाद इसरू खान (वय २४ वर्षे), रा. झारोकरी, ता. पुन्हाना, जि. नुहू, राज्य हरियाणा.

ही कारवाई रामतीर्थ पोलिसांच्या सतर्कता, धाडस आणि तपास कौशल्याचे द्योतक मानली जात आहे. नागरिकांमध्ये निर्माण झालेली भीती दूर करत पोलिसांनी अल्पावधीतच गुन्हेगारांच्या मुसक्या आवळून कायद्याचा धाक पुन्हा अधोरेखित केला आहे.

तालुक्यातील एटीएम फोडणाऱ्या चोरट्यांचा पर्दाफाश करून रामतीर्थ पोलिसांनी जनतेचा विश्वास अधिक दृढ केला असून, पुढील तपास सुरू आहे.


# व्हि.पी.के उद्योग समूह गाळप हंगाम देणार उसाला उच्चांकी भाव

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. १५ फेब्रूवारी-**

व्हि.पी.के उद्योग समूहातील व्हि.पी. के.अँग्रो प्रयागनगर सिंधी व डॉ. शंकरराव चव्हाण जागरी अँग्रो प्रोडक्ट कुसुमनगर वाघलवाडा आणि एम व्ही के अँग्रो प्रा.ली कुसूमनगर वाघलवाडा ता उमरी या तिन्ही कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यानं साठी आनंदाची व आर्थिक दृष्ट्या सुबकता देणारी भाववाढ योजना उद्योग समुहाचे चेअरमन मा.मारोतराव पा कवळे गुरुजी यांनी जाहीर केली आहे.

माहे जनिवरी पासून गाळपासाठी येणाऱ्या उसाला दर पंधरा दिवसांनी पन्नास रुपये भाव वाढीची योजना मागील चार वर्षा पासुन उद्योगसमूहा मार्फत राबवण्यात येत आहे.

आता सुरू असलेल्या गाळप हंगामात देखील याच पद्धतीने योजना रबण्यात आली



असून मार्च महिन्याच्या ०१ ते १५ तरखेसाठी ५०/- रू भाव वाढ अपेक्षित होती परंतु ती वाढवून १००/- रू करण्यात आली आहे त्यामुळे मार्च महिन्यात गाळपासाठी येणाऱ्या उसाला प्रती टन ३०००/- सभासादा साठी व २८००/- रू बिगर सभासदा साठी भाव असेल याची नोंद घेऊन सर्व शेतकरी बांधवांनी ऊस तोडणीसाठी घाई न करता व इतर कारखान्यास ऊस न देता आपला ऊस पाणी देऊन राखून ठेवावा व आपल्या हक्काच्या कारखान्यास ऊस गाळपासाठी देऊन सहकार्य करावे व या अभूतपूर्व भाव वाढ योजनेचा लाभ घ्यावा..

ज्या शेतकऱ्यांनी सभासद ठेव रक्कम भरली नसेल त्यांनी लवकरात लवकर आपली सभासद ठेव भरून भरून सभासद नोंद करावी..

आता सभासद ठेव रक्कम भरून सभासद नोंदणी केलेल्या शेतकऱ्याचा ऊस या हंगामात म्हणजेच २०२५-०२६ मध्ये सुरुवातीला गाळपासाठी आलेला असला तरी त्यांना प्रती टन २००/- रू भाव वाढ दीपावली सणाला मिळणार आहे याची नोंद घेऊन जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे अव्हाण चेअरमन तथा उदोजक मारोतराव कवळे गुरुजी यांनी केले आहे .

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## प्रभावी रिझ्युम बनवा अन् करिअर घडवा - डॉ.ज्ञानेश्वर चौधरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ फेब्रुवारी :** सध्याचे युग स्पर्धेचे युग असले तरी करिअर घडविण्यासाठी आज एकविसाव्या शतकात अनेक क्षेत्र खुले आहेत.आपापल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर घडविले पाहिजे. म्हणूनच मुलाखत व नोकरीसाठी प्रत्येकांनी प्रभावी रिझ्युम तयार करणे अत्यंत गरजेचे आहे.रिझ्युममध्ये स्वत:चे नाव,संपर्क माहिती, करिअरचे उद्दिष्ट,कामाचा अनुभव,शिक्षण आणि कौशल्ये यांचा स्पष्ट उल्लेख केला पाहिजे.तांत्रिक आणि सॉफ्ट स्किल्स याचीही नोंद केली पाहिजे.रिझ्युममध्ये व्याकरण आणि स्पेलिंगच्या चुका टाळल्या पाहिजेत,असे प्रतिपादन निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयातील इंग्रजी विभागातील प्रा.डॉ.ज्ञानेश्वर चौधरी यांनी केले.येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील इंग्रजी विभागाच्या वतीने दि.१३ फेब्रुवारी २०२६ रोजी यशासाठी एक प्रभावी रिझ्युम तयार करणे या उद्बोधनपर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले होते.यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.त्यांनी रिझ्युमच्या विविध प्रकारांचे विश्लेषण केले. तसेच रिझ्युम,बायोडाटा आणि सी.व्ही. यातील फरक स्पष्ट केला. प्रभावी रिझ्युम राईटिंगसाठी महत्वपूर्ण टिप्स दिल्या ज्या विद्यार्थ्यांना भविष्यात फायदेशीर ठरतील.याप्रसंगी व्याख्यान कार्यक्रम समन्वयक इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.मेघा पंडित,हिंदी विभाग प्रमुख डॉ.गजानन बने,मराठी विभाग प्रमुख डॉ.रामशेट्टी शेटकार यांची प्रमुख उपस्थिती होती.



## विविध वृत्त...

### श्री पांडुरंग विद्यालयातील विद्यार्थ्यांची देशभक्तीपर चित्रकला

**उदगीर :** आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत पुलवामा शहीद स्मृतीदिनाचे औचित्य साधून श्री पांडुरंग विद्यालय, कल्लूर येथील विद्यार्थ्यांनी देशभक्तीची भावना व्यक्त करत शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी अर्थपूर्ण चित्रकला उपक्रम राबविला. विद्यार्थ्यांनी तिरंगा, भारतीय सैनिकांचे शौर्य, राष्ट्रसेवा आणि बलिदान यांचे प्रभावी चित्रण रंगरेषांमधून साकारत कृतज्ञता व्यक्त केली. या उपक्रमामध्ये ''शहीद अमर रहें'', ''देशासाठी बलिदान देणाऱ्या वीरांना सलाम'' अशा घोषवाक्यांद्वारे राष्ट्रनिष्ठा जागृत करण्यात आली.

कला या प्रभावी माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, त्यागभावना आणि सामाजिक जाणीव दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या चित्रांमधून व्यक्त झालेली देशभक्ती उपस्थितांना भावनिक करणारी ठरली. या प्रसंगी संस्थेचे सचिव विनायकराव बेंबडे, मुख्याध्यापक एस. व्ही. नादरगे तसेच सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शहीदांच्या बलिदानातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कलाशिक्षक चंद्रदीप नादरगे यांनी मार्गदर्शन केले. आनंददायी शनिवाराच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, कृतज्ञता आणि जबाबदारीची भावना अधिक दृढ होऊन शहीदांच्या स्मृती जागृत ठेवण्यास मोलाची मदत झाली.

### सरस्वती महाविद्यालयात संत सेवालाल महाराज जयंती साजरी

**लातूर :** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी थोर समाजसुधारक संत सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.पांडुरंग गोरे यांनी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.याप्रसंगी प्रा.अमोल जाधव यांनी संत सेवालाल महाराज यांचे जीवन व कार्य या विषयावर विचार व्यक्त केले यावेळी ते म्हणाले की,शुरवीर,लढवय्या थोर मानवतावादी संत सेवालाल महाराज यांनी परक्याची गुलामगिरी न स्वीकारता काबाडकष्ट करून आत्मसन्मानाने जीवन जगणार्या बंजारा समाजाबरोबरच सर्वांनी समाजातील वाईट प्रथा नष्ट करून समस्त मानवजातीला मानवतेचा व पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला.त्यांच्या या जयंती निमित्ताने संत सेवालाल महाराजांच्या मानवतावादी आणि सत्यवादी विचाराचे आचरण प्रत्येकांनी करावे असे प्रतिपादन प्रा.जाधव यांनी यावेळी केले.याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महात्मा बसवेश्वरमध्ये सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात

**लातूर :** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, जयंती उत्सव समिती आणि आस्थापना विभाग, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय समाज सुधारक क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांची जयंती महाविद्यालयातील प्राचार्य कक्षात उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे, पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, प्रो. डॉ. संजय गवई, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे आणि के. आर. कोळी यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम भारतीय समाज सुधारक क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले.यावेळी कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांनी सेवालाल महाराज यांच्या जीवनकार्याची माहिती दिली. त्यानंतर प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे यांनी अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव बेंदरगे यांनी केले तर आभार प्रा. नितीन वाणी यांनी मानले.

# गवळी समाजाच्या दुग्धाभिषेकाने ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर देवस्थानच्या यात्रेचा शुभारंभ

## ▸ जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजारोहण ▸ दर्शनासाठी भाविकांच्या मध्यरात्रीपासूनच रांगा ▸ हर हर महादेवच्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमला







**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ फेब्रुवारी :** शनिवार व रविवारच्या मध्यरात्री गवळी समाजाच्या वतीने लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वरांना दुग्धाभिषेक करण्यात आला. परंपरेप्रमाणे या दुग्धाभिषेकानंतर महाशिवरात्री यात्रेचा शुभारंभ झाला. सिद्धेश्वराच्या दर्शनासाठी लातूर व पंचक्रोशीतील भाविकांनी मध्यरात्रीपासूनच रांगा लावल्या होत्या. सकाळी जिल्हाधिकारी व मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी दिवाणी न्यायाधीश गोटे व धर्मादाय सह आयुक्त राजेश सासणे, प्रशासक सचिन जांबुतकर आणि विश्वस्त उपस्थित होते.

लातूरसह सीमावर्ती भागात सिद्धेश्वरांची महाशिवरात्री यात्रा प्रसिद्ध आहे.या कालावधीत सिद्धेश्र्वरांचे दर्शन घेण्यासाठी तसेच यात्रेचा आनंद लुटण्यासाठी लाखो भक्त लातूर येथे येत असतात. शिवरात्रीपासून यात्रेला प्रारंभ होतो. दरवर्षीच्या परंपरेप्रमाणे गवळी समाजाच्या वतीने मध्यरात्री वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढत मंदिरात येऊन श्री सिद्धेश्वरांना दुग्धाभिषेक करण्यात आला. यानंतर मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी सौ. वर्षा ठाकूर घुगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून यात्रा महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. दिवाणी न्यायाधीश गोटे, सह धर्मादाय आयुक्त राजेश सासणे व प्रशासक सचिन जांबुतकर, ईशानी घुगे यांच्यासह ज्येष्ठ विश्वस्त विक्रमतात्या गोजमगुंडे,श्रीनिवास लाहोटी, अशोक भोसले, बाबासाहेब कोरे,नरेश पंड्या,सुरेश गोजमगुंडे, रमेशसिंह दिसेन, मन्मथ लोखंडे, चंद्रकांत परदेशी, व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे आदींची यावेळी उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते श्री सिद्धेश्र्वरांची महापूजा व महाआरती करण्यात आली. यावेळी विश्वस्त मंडळाकडून उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

दरवर्षीप्रमाणेच श्री सिद्धेश्वरांच्या दर्शवण्यासाठी भक्तांनी मध्यरात्रीपासूनच रांगा लावल्या होत्या. हर हर महादेव'चा जयघोष करीत भाविक-भक्त रांगा लावून दर्शन घेत होते.भक्तांना दर्शन घेण्यात कुठलीही अडचण येऊ नये यासाठी विश्वस्त मंडळाच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.दर्शन रांगा तसेच भक्तांना पिण्याचे पाणी उपलब्ध होते.दर्शन रांगेमध्ये आरोग्य विषयक समस्या निर्माण झाल्या तर उपचारासाठी वैद्यकीय पथकही तत्पर होते. देवस्थान व भालचंद्र रक्तपेढीच्या सहकार्यातून रक्तदान करणाऱ्यांना थेट दर्शन देण्याचा उपक्रम यावर्षीही राबविण्यात आला.या शिबिराला दर्शनासाठी येणारे भक्त,नागरिक व युवकांनी मोठा प्रतिसाद दिला.

यात्रा कालावधीत होणारी गर्दी लक्षात घेता पोलीस प्रशासनाच्या वतीने मंदिर परिसरात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. यात्रा कालावधीत विविध सोयी- सुविधा पुरविण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीनेही व्यवस्था करण्यात आली आहे.

## वीर परिवार सहाय्यता योजनेंतर्गत शिबिरात विधी सेवा विषयक मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ फेब्रुवारी :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या वीर परिवार सहाय्यता योजना २०२५ अंतर्गत लातूर जिल्ह्यातील कार्यरत, सेवानिवृत्त सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांना मोफत व सक्षम विधी सेवा उपलब्ध करून देण्यासाठी ११ फेब्रुवारी रोजी एक विशेष शिबीर आयोजित करण्यात आले होते. लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे झालेल्या या शिबीराचे आयोजन लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित शिबीरास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद प्रकाश पांढरे (नि.), पॅनल विधीज्ञ ॲड. एस. व्ही. सलगरे, माजी सैनिक संघटनेचे कृष्णा गिरी, जय जवान जय किसान माजी सैनिक संघटनेचे सयद शबीर, न्याय मित्र चरक सौदागर, तसेच वीर पत्नी, वीर माता-पिता, सेवानिवृत्त सैनिक यावेळी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना श्री. गिरवलकर म्हणाले, वीर परिवार सहाय्यता योजना भारतीय सुरक्षा दलातील कार्यरत सैनिक, सेवानिवृत्त सैनिक आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबातील सदस्यांना लागू आहे. मालमत्ता विवाद, शासकीय कल्याणकारी योजनांशी संबंधित प्रकरणे, कौटुंबिक वाद, दिवाणी स्वरूपाचे इतर वाद यांसारख्या बाबींसाठी संबंधित विधी सेवा प्राधिकरणामार्फत मोफत व सक्षम विधी सेवा पुरवली जाते. योजनेच्या तरतुदीनुसार, लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात विधी सेवा क्लिनीक स्थापन करण्यात आले आहे. कार्यरत, माजी सैनिक तसेच शहीद जवानांच्या कुटुंबियांना सन्मानाची वागणूक मिळावी आणि त्यांना कायदेशीर अडचणींमध्ये सहज मदत उपलब्ध व्हावी यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे. लातूर जिल्ह्यातील सर्व कार्यरत व सेवानिवृत्त जवान आणि त्यांच्या कुटुंबियांना मोफत विधी सेवा पुरविण्यास लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर कटिबद्ध असल्याचे श्री. गिरवलकर यांनी सांगितले.

## प्रा.मारोती बुद्रुक यांचा राज्यस्तरीय शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. १५ फेब्रुवारी :** संजीवनी फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सिन्नर नाशिक येथे आयोजित भव्य राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात प्रा.मारोती बुद्रुक पाटील यांना ''शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव २०२५'' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे होते.

शुभ हस्ते महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री बच्चुभाऊ कडू माजी मंत्री रविकांत दादा तुपकर,सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सह.साखर कारखान्याचे चेअरमन विवेक भैया कोल्हे, महाराष्ट्रातील प्रख्यात लोककलावंत रघुवीर खेडकर, महाराष्ट्र राज्याच्या महिला आयोगाच्या सदस्या उत्कर्षा रूपवते, महाराष्ट्र शासनाच्या युवा धोरण समितीचे सदस्य संग्राम भैया शेवाळे, नाशिकच्या जिल्हा परिषदेचे सदस्य उदय भाऊ सांगळे, मृद व जलसंधारण विभागाचे महाराष्ट्र राज्याचे सहसचिव हरिभाऊ गीते, छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेचे उपायुक्त विकास दादा नवाळे, संजीवनी फाउंडेशनचे चेअरमन डॉ.ज्ञानेश्वर सानप आदी मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रा.मारोती बुद्रुक पाटील यांनी व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, महापुरुषांच्या विचारांचे प्रभावी प्रबोधन, ग्रामीण भागात पथनाट्याद्वारे जनजागरण आणि समाजजागृती अशा विविध माध्यमांतून राज्यभर उल्लेखनीय कार्य केले आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत त्यांनी सातत्याने प्रवास करून युवकांमध्ये राष्ट्रभक्ती, सामाजिक बांधिलकी आणि सकारात्मक जीवनमूल्यांची प्रेरणा रुजवली आहे. त्यांच्या प्रभावी निवेदन शैलीने, ओजस्वी वक्तृत्वाने आणि तळमळीच्या कार्याने समाजमनात जागृती निर्माण झाली आहे.जगद्गुरु तुकोबाराय योगा ग्रुपच्या माध्यमातून योगासने धडे समतेचा विचार दिला.

आपल्या प्रबोधनातून व सूत्रसंचालना मधून कबीराची अमृतवाणी मीराबाईचे दोहे जनमानसात रुजविले व्याख्यान प्रवचन समाज प्रबोधन याच्या माध्यमातून समाजहिताचा ध्यास घेऊन कार्य करणाऱ्या या प्रबोधनकाराला ''शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव २०२५'' हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

या सन्मानाबद्दल महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव,सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, चंचल भारती विद्या विकास मंडळाचे सचिव विक्रम सिंह दोडके पाटील, कार्याध्यक्षा पुष्पाताई दोडके पाटील, समन्वयक श्रीहरी पवार, मुख्याध्यापक निळकंठ सकनुरे यांनी व व सिद्धेश्वर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयातील सर्व सहकारी पत्रकार बांधव सामाजिक क्षेत्रातील विविध मित्रपरिवार व जगद्गुरु तुकोबाराय योगा ग्रुपच्या सर्व परिवाराने अभिनंदन केले आहे

## श्री सिध्देश्वर, रत्नेश्वर महाशिवरात्री यात्रेचा श्रीच्या झेंडा मिरवणूकीने प्रारंभ



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ फेब्रुवारी :** लातूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्र्वर, रत्नेश्र्वर देवालय महाशिवरात्री यात्रेचा प्रारंभ प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही श्री गौरीशंकर मंदिर मार्केट यार्ड येथे श्री चा झेंडा पुजन करून देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांच्या हस्ते करण्यात आला.

ही मिरवणूक मार्केट यार्ड मधून निघून लातूर शहरातील गुळ मार्केट, हनुमान चौक, सुभाष चौक,खडक हनुमान,तेली गल्ली, पटेल चौक मार्गे सिध्देश्र्वर मंदिरात पोहचली. सिद्धेश्र्वर मंदिरात मान्यवरांच्या हस्ते आरती होऊन सांगता झाली.

या मिरवणूकीत महाकाल अघोरी मंडळ हरीयाणा,लेझीम पथक सोलापूर, ढोल पथक नांदेड, विजापूरचे सोंग,महिला भजनी मंडळ,जय मल्हार वारू, बालक भजनी मंडळ,बॅन्ड पथक, नंदी महादेव यांचा भव्य देखावा सादर करण्यात आला. या भव्य दिव्य अशा मिरवणूकीने लातूरकरांची मने जिंकली.

याप्रसंगी देवस्थानचे प्रमुख विश्र्वस्त विक्रम गोजमगुंडे, श्रीनिवास लाहोटी, प्रदीप राठी, बाबासाहेब कोरे, मन्मथप्पा लोखंडे, चंद्रकांत परदेशी, अशोक भोसले, नरेश पंड्या, सुरेश गोजमगुंडे, अप्पासाहेब घुगरे, अशोक भोसले, नरेश पंड्या, सुरेश गोजमगुंडे,चंद्रकांत परदेशी, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, बाजार समितीचे सचिव सतिश भोसले, नंदकिशोर अंकलकोटे, सचिन आलमले, संदीप तिवारी, राजू धुमाळ, नागेश उटगे, धुळाप्पा आरबळे आदी भाविक भक्त उपस्थित होते.

### गजानन बंडेवार यांचा टीईटी उत्तीर्ण झाल्याबद्दल सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. १५ फेब्रुवारी :** दुर्गामाता माध्यमिक आश्रम शाळा नळगीर येथील मराठी विषयाचे सहशिक्षक गजानन बंडेवार हे टीईटी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल ॲड सोमेश्वर राऊत व त्यांची पत्नी श्री छत्रपती शाहू महाराज सैनिकी विद्यालयातील रसायनशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका सीमा मेहत्रे राऊत यांनी त्यांचा सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयास राज्य शासनाचा ऊर्जा संवर्धनाचा सलग तिसऱ्यांदा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ फेब्रुवारी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयांनी ऊर्जा संवर्धन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा १८ वा राज्यस्तरीय ऊर्जा संवर्धन पुरस्कार (२०२४-२५) सलग तिसऱ्यांदा पटकावला आहे. हा मानाचा पुरस्कार महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा )यांच्या वतीने प्रदान करण्यात आला.




महाविद्यालयाने ऊर्जेची केलेली बचत, प्रभावी एनर्जी ऑडिट, सौरऊर्जा व इतर पर्यायी ऊर्जास्रोतांचा वापर तसेच विद्यार्थ्यांमध्ये आणि समाजात ऊर्जा संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी राबविलेल्या विविध उपक्रमांमुळे हा प्रतिष्ठेचा सन्मान मिळविला आहे. दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनाखाली ऊर्जा संवर्धनाचे नियोजनबद्ध काम करण्यात आले. शैक्षणिक विकास अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड, प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, ऊर्जा संवर्धन समन्वयक डॉ. कोमल गोमारे, एनर्जी ऑडिटर केदार खमितकर व किरण खमितकर यांनीही या उपक्रमात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

महाविद्यालयात शाश्वतता, ऊर्जा कार्यक्षमता आणि आधुनिक शिक्षणपद्धती यांना प्राधान्य देत विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत.सोलार पॅनल सिस्टीम आहे.पारंपरिक उच्च तीव्रतेच्या दिव्यांवरील प्रोजेक्टरऐवजी ऊर्जा-बचत करणारे एलईडी स्मार्ट बोर्ड बसविण्यात आले असून त्यामुळे वीज वापरात लक्षणीय बचत होत आहे. अध्यापन अधिक प्रभावी व संवादात्मक झाले आहे.कार्यशाळा व शैक्षणिक उपक्रमांसाठी सुसज्ज वातानुकूलित सेमिनार हॉल उपलब्ध असून संशोधन प्रयोगशाळांमध्ये पाच-तारांकित दर्जाची ऊर्जा-कार्यक्षम उपकरणे वापरात आहेत.अत्याधुनिक शैक्षणिक व संशोधनाधारित सॉफ्टवेअरचा वापर करून गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते.

ऊर्जा संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी ऊर्जा जनजागृती व्याख्याने, कर्मचारी बैठकीत ऊर्जा प्रतिज्ञा सत्र, सादरीकरणे तसेच डरींं जींं? डळसहीं जींं! सारख्या स्मरण फलकांची स्थापना करण्यात आली आहे.स्विच व प्रयोगशाळांजवळ जबाबदार ऊर्जा वापराचे संदेश देऊन वर्तनात्मक बदल घडविण्यावर भर दिला जात आहे. या सर्व उपक्रमांमुळे महाविद्यालयात ऊर्जा बचतीची सशक्त आणि पर्यावरणपूरक संस्कृती विकसित झाली आहे.

यापूर्वीही महाविद्यालयाने राष्ट्रीय पातळीवर यश संपादन केले आहे. सन २०२२ मध्ये भारत सरकारच्या विद्युत मंत्रालयातर्फे प्रदान करण्यात येणारा 'राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण पुरस्कार' प्रथम क्रमांकाने मिळाला होता. हा पुरस्कार भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला होता. तसेच ऊर्जा कार्यक्षमतेतील अनुकरणीय कार्याबद्दल १४ डिसेंबर २०२५ रोजी नवी दिल्ली येथील विज्ञान भवन येथे आयोजित समारंभात 'राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन पुरस्कार-२०२५' प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहर लाल खट्टर व ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांच्या हस्ते प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांनी स्वीकारला होता.

दयानंद विज्ञान महाविद्यालयास यापूर्वी सन २०२०-२१ मध्ये १६ वा आणि सन २०२१-२२ मध्ये १७ वा राज्यस्तरीय ऊर्जा संवर्धन पुरस्कार जाहीर करण्यात आला होता. त्या यशाची परंपरा कायम राखत २०२४-२५ चा १८ वा पुरस्कार जाहीर झाला आहे.

ऊर्जा संवर्धन हे प्रत्येक नागरिकाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. ऊर्जेचा अपव्यय टाळून पर्यावरणपूरक उपाययोजना राबविणे ही काळाची गरज असल्याची जाणीव ठेवून दयानंद विज्ञान महाविद्यालयाने कृतीशील पावले उचलली आहेत. सलग तिसऱ्यांदा मिळालेल्या या सन्मानामुळे प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचा उत्साह द्विगुणित झाला असून समाजात ऊर्जा बचतीचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक व संपूर्ण टीमचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. ऊर्जा संवर्धन हीच काळाची गरज हा संदेश अधोरेखित करत महाविद्यालयाने राष्ट्रीय व राज्यस्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.